# सातांऱ्याचें देव का देवांचा सातारा.

इति. ११८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

लेखक केशव सी ठाकरे


सन १९१९

पुस्तकाचें नांव सातांऱ्याचें देव का देवांचा सातारा

क्रमांक २०५

२०५ इति.

...सी, बुधवार पेठ, पुणे. ( २ )
पुण शहर. ( ३ ) नारायणराव दाळवे-
कर. ( ४ ) मुजुम्दार न्यूज एजंट,
बाबूराव बागवे, दादर ( मुंबई. )
एजन्सी, बेळगांव. ( ७ ) भाऊराव
जि. सातारा. )



इ-११८ अनु-२०५



मिळुक्शाहीच्या गुप्त कारस्थानास बळी पडलेला

महाराष्ट्रीय हिंदुजनतेचा आदर्श

# श्रीमच्छत्रपति प्रतापसिंह.

हद्दपारी :— ४ सप्टेंबर १८३९.

काशी मुक्कामी मृत्यु :— १४ ऑक्टोबर १८४७



केवळ स्वार्थासाठीं

भिक्षुकशाहीच्या कटांत पचनीं पडलेला घरभेद्या

**आप्पासाहेब भोसला.**

[illegible]निया कुंफणीच्या चरणारविंदीं नातूमार्फत शरण

ता २४ मार्च १८३९

राज्यारोहण ता. १८ नवंबर १८३९

# साताऱ्याचें दैव का दैवाचा सतारा !



**सातारा !** एकच शब्द आणि तीनच अक्षरें. पण त्यांत किती सुखदुःखाच्या गोष्टी, आशा निराशेचा इतिहास आणि अंगावर रोमांच उभे करणाऱ्या स्मृतींची व हृदयविदारक कल्पनांची साठवण झालेली आहे? हिंदवी स्वराज्याच्या पुनर्घटनेचा धडाडीचा भगिरथ प्रयत्न येथेंच झाला आणि त्या स्वराज्याच्या बलीदानाचा भिक्षुकी यज्ञ येथेंच धडाडला. छत्रपतींच्या सार्वभौम सत्ताप्रसाराची दिव्य शक्ती येथेंच प्रथम फुरफुरली व अटकेपार गुरगुरली, आणि छत्रपति मालकाची स्वारी पेशवे नोकरांच्या कैदखान्यांत येथेंच गुरणीस लागून बेजार झाली. समाज व धर्म कारणांच्या क्षेत्रांत आज मगरूर झालेल्या व राजकारणांत [illegible]च्या महाराष्ट्राची स्वयंसेन्य कडवेगिरी

गाजविणार्‍या चित्पावन बृहस्पतींच्या लौकिकाची प्राण प्रतिष्ठा येथेंच साजरी झाली; आणि चित्पावनांनीं आपल्या आत्मप्रतिष्ठे खातर छत्रपतीच्या प्राणाची व सत्तेची आहुती याच नगरांत दिली. जिंजीच्या आत्मयज्ञांत महाराष्ट्राची राष्ट्रीय इभ्रत तावून सुलाखून काढणारे पुरुषोत्तम येथेंच नांदले; आणि त्याच इभ्रतीचे हातपाय चित्पावनांनीं केवळ आपल्या स्वार्थासाठीं इंग्रेजी डावपेचांच्या लोखंडी शृंखळांत येथेंच बांधले. शिवरायाच्या नांवासाठीं तमाम हिंदुस्थानांत रक्ताचे सडे घालणारे वीर महावीर येथेंच थरा रले; आणि भिक्षुकी पेशवे राहूंचें, छत्रपतीला खग्रास ग्रहण लागतांच ब्राह्मण-भोजनाच्या खरकट्या पत्रावळी व द्रोणांचे पर्वतप्राय खच येथेंच पडले. भिन्नभिन्न संस्कृत्यनुरूप महाराष्ट्रांतील यच्चावत् सर्व ब्राम्हण ब्राम्हणे तर जातींचा देशहितासाठीं व राष्ट्रोद्धारासाठीं याच सातार्‍यांत उद्धार झाला आणि चैनी व रंगेल शाहू छत्र पतीच्या राजविलासी मग्नतेचा फायदा घेऊन चित्पाव नांनीं चित्पावनेतरांना माजी पाडण्याच्या कटाचा भिक्षुकी पाया येथेंच घातला. हिंदूंच्या हिंदुत्व-रक्षणाचे व प्रसा राचे प्रयत्न येथेंच झाले आणि ब्राम्हण-ब्राम्हणेतर भेदाच्या विषवल्लीचें पुणेरी बीज प्रथम येथेंच पेरलें गेलें. गाई ब्राह्मणांच्या संरक्षणाचे प्रतिज्ञाकंकण 'चढविलेलें छत्रपति याच सातार्‍यांत गाजले; आणि ब्राम्हणी धर्माच्या यज्ञांत त्याच छत्रपतींना पेशव्यांनीं जिवंत भाजून, टोप करी सेनेला गोमांसाच्या मेजवान्यांनीं येथेच संतुष्ट केलें.

भट घराण्याची पेशवाई चिटणिशी कलमान्या मखलाशींत येथेंच जन्म पावली; आणि पेशव्यांच्या मखलाशीनें चिटणिशी घराण्याची राखरांगोळी येथेंच झाली. क्षत्रिय मराठ्यांच्या दणकट क्षात्रतेजावर ब्राम्हणांच्या जानवी शेंड्यांचें रक्षण याच राजधानीनें केलें; अखेर त्याच ब्राम्हणांनीं आपल्या जानवी शेंड्यांच्या वर्चस्वासाठीं परकी टोपकरांशीं संगनमत करून, मराठ्यादि अखिल चित्पावने तरांना 'शूद्राधम' ठरविण्यासाठीं छत्रपति प्रतापसिंहाचा गळा याच साताऱ्यांत भर-मध्यान्ह रात्रीं कापला. ब्राम्हणी विद्येला उत्तेजन देणारी वेदशाळा छत्रपतींनीं येथेंच स्थापन केली; आणि कायस्थ मराठ्यादि क्षत्रियांना शूद्र ठर विण्याचीं भिक्षुकी कारस्थानें अखेर येथेंच शिजली. विद्या संपन्न भिक्षुकांना छत्रपतींनीं शालजोड्यांची खैरात येथेंच वाटली; व त्याच भिक्षुकांच्या सैतानी कारस्थानांनीं हद्दपार होणारी छत्रपतीची मूर्ती एका मांडचोळण्याशिवाय उघडी नागडी स्वराज्य स्वदेशाला येथेंच मुकली. छत्रपतींच्या पायाच्या धुळींतून पंत-सचीव, पंत आमात्य, पंत प्रति निधि, पंत पेशवे इत्यादि भिक्षुकी पंतें येथेंच निर्माण झालीं; आणि अखेर याच पंत संतांनीं ब्राम्हणी कारस्थानें रचून छत्रपतीला याच साताऱ्यांत अखेरची मूठ चारली. रायगडला विसकटलेली स्वराज्याची घडी दैवाच्या सता ऱ्यानें साताऱ्यास बसवितांना छत्रपति राजाराम महा राजांनीं ब्राम्हणांना आकंठ अमृतभोजन घातलें तें येथेंच; आणि ब्राम्हणी वर्चस्वाचा भिक्षुकी डोला उभारण्यासाठीं

छत्रपतीचा, व त्याबरोबरच हिंदवी स्वराज्याचा कंठ चर-चरा चिरून ब्राम्हणांनीं ब्राम्हणेतरांचा सूड उगविला तोहि येथेंच. ब्राम्हणांना चारलेल्या अमृतान्या मेजवान्यांचें पारणें अखेर हिंदवी स्वराज्याच्या खुनाच्या मुखशुद्धींत पार पडलें. दैवाचा सतारा फिरला, रायगड डळमळला, छत्रपति हाल हाल होऊन मोंगलांच्या छावणींत ठार मारला गेला; पण महाराष्ट्रांतल्या खऱ्या राष्ट्रवीरांचा धीर सुटला नाहीं. त्यांनीं लगबग करून करनाटकांत राजकारणी नाटक केलें आणि स्वराज्याच्या अकल्पनीय पुनर्घटनेनें मोंगली मुत्सद्देगिरीला चारी मुंड्या चीत केलें. सातान्याचें दैव उदयाला आलें. पण पुन्हा दैवाचा सतारा फिरला आणि

## ४ सप्टेंबर १८३९ च्या मध्यरात्रीं

बारा वाजतां छत्रपति प्रतापसिंहाच्या हद्दपारीनें सातान्याचें दैव फिरलें आणि भिक्षुकांच्या देशद्रोहाला, धर्मद्रोहाला आणि राष्ट्रद्रोहाला हिंदवी स्वराज्याचा अखेरचा बळी पडला.

## ब्राम्हणांनीं हिंदवी स्वराज्याचा खून केला.

यानंतर यशवंतराव शिर्के, भगवंतराव विठ्ठल चिटणीस आणि स्वराज्यवादी रंगो बापूजी इत्यादि अनेक पुरुषोत्तमांनीं विलायतेची कायदेबाजी लढवून थकल्यावर, रंगो बापूजीनें १८५७ सालीं सातान्याच्या फिरत्या दैवाचा

सतारा पलटविण्यासाठीं स्वराज्याच्या पुनर्घटनेचा अखे रचा मऱ्हाटशाही धडाडीचा यत्न केला. पण ऐन वट केलाच पंत सचिवाच्या घरभेदाच्या टोपकरी चापांत तो सांपडला आणि उत्तर हिंदुस्थानांत रचलेल्या व्यूहांत 'मर्दानी झांशीवाली' देवी लक्ष्मी, धोंडोपंत नानासाहेब, तात्या टोपी प्रभृति वीरांना हकनाहक राष्ट्रोद्धाराच्या यत्न-यज्ञांत ठार मरावे लागले. केवळ स्वार्थासाठीं राष्ट्रकार्याला आग लावण्याची ब्राम्हणी कारस्थानांची ही अखंड परंपरा पाहिली कीं विद्यमान राजकारणांत ब्राम्हणांच्या कासो ट्याच्या आधारानें आत्मोद्धार साधूं पहाणाऱ्या माणसांना माणूस म्हणणारा माणूस एक माथेफिरू तरी असावा, किंवा अजागळ गद्धा तरी असावा. भिक्षुकांच्या हात लावणीनें आणि कावेबाज टोपकरांच्या मेहेरबानीनें, भावाच्या गादीवर घरभेद्या आप्पासाहेब भोसला छत्रपति म्हणून १८ नवंबर १८३९ रोजीं जरी बसला, तरी साताऱ्याच्या दैवाचा सतारा एकदां उलटा फिरला तो कायम. साता ऱ्याचें स्वराज्य गेलें, तेव्हांच तेथल्या भोसले घराण्याचें छत्रपतित्व मेलें. या पुढचे छत्रपति म्हणजे इब्राईम करीम च्या हरण छापाच्या छत्र्या वापरणारे दत्तक जहागिरदार! यापेक्षां अधिक काय राहिलें आहे? आजचा सातारा म्हणजे पूर्वीच्या स्वराज्यरूपी आत्मा वावरलेल्या देहाचें नुसतें मढें आहे. स्वराज्याच्या आकांक्षा साताऱ्यांत कधींच जळून खाक झाल्या आहेत. भिक्षुकी कारस्थानांच्या त्या पापभूमीवर स्वराज्याचें बीज मुळीं जीवच धरणार नाहीं,

इतकी तेथील जमीन ब्राम्हणी तंत्रयंत्रादि मंत्रांनीं वांझोटी बनली आहे. साताऱ्याच्या आसपास त्याच पूर्वीच्या टेकड्या आणि डोंगर आजहि आहेत. अजिंक्य तारा तोच आहे. राजवाडाहि जुनाच उभा आहे. त्यांतच जुन्या माणसांचे नवे वंशज कसे तरी कोठें तरी रहात आहेत. पण बाह्य दृष्टीला दिसणाऱ्या या जड सृष्टींत आज कसलें चैतन्य आहे? डोंगर टेकड्यांतून आज स्वराज्याचा पड साद उमटत नाहीं. त्यांवरून वाहणाऱ्या वाऱ्यांत आज कसल्याहि स्फूर्तीचा संदेश नाहीं. अजिंक्य तारा म्हणजे दगड मातीचा एक डोंगर. कधीं काळीं मामलतदाराचा 'फास' घेऊन एकंदां फेरफटका "करून" येण्याच्या लायकीचें जुनाट टेकाड. राजवाड्यांत तर काय, कायदेबाजी आणि कज्जेदलालीचा व्यापार भरभक्कम चालूच आहे. समर्थांच्या त्या सज्जनगडावर अवघ्या दुर्जनांचा सुळसुळाट. कोठेंहि पूर्वीच्या मऱ्हाटशाहीचा जिवंतपणा उरलेला नाहीं. खुद्द सातारा शहर सुद्धां उदास आणि ऐदी दिसतें. ज्या शहरांत अखिल महाराष्ट्राच्या राजकारणी व स्वयंनिर्णयी चैतन्याचा खून ब्राम्हणांनीं पाडला, तेथें कसलें तेज आणि कसली भरभराट? आज सातारा स्वराज्याकरितां प्रसिद्ध नाहीं. साताऱ्याची प्रसिद्धी म्हणजे

## सातारी पेढा व ब्राम्हणांचा वेढा

यांत आहे. स्वराज्याचा विध्वंस केल्या दिवसापासून सातारा जिल्ह्यांतला पवित्र ब्रम्हवृंद मारवाडी कसायाच्या

धंद्यानें ब्राम्हणेतर मराठ्यांच्या अज्ञानावर पोळाप्रमाणें चरून, बराच धनकनकसंपन्न होऊन बसला आहे. इंग्रजी विद्येचा प्रसार व तदंगभूत विवेकवाद कितीहि फैलावला असला आणि पदवीधरांचें प्रमाण कितीहि वाढलें असलें, तरी ब्राम्हणांची भोजनाची चटक कांहीं केल्या कमी होत नाहीं. खरकट्याच्या जन्मसिद्ध स्वराज्याच्या हक्कासाठीं लढायला दरसाल किती तरी पुणेरी भिक्षुक वीर बिनचुक सज्जनगडावर जात असतात. सारांश, साताऱ्याचें दैव सध्यां अशा प्रकारचें आहे. विशेष कांहीं असेल तर एवढेंच कीं पुणेरी देशभक्तांच्या तोंडाळ लेखाळपणाची प्रतिध्वनि साताऱ्यांत बिनचुक उमटतो; इतका या दोन शहरांत भिक्षुकी एकजिनसीपणा आहे. एखादा ऐतिहासिक पुनरावृत्तीचा दाखला कोणी मागितलाच तर पुण्याच्या बाळंभट नातूच्या 'डिअरफ्रेंड खुरशेदजी मोदी 'चा एक अवतार हल्लीं साताऱ्यांत सार्वजनिक हितवादाच्या क्षेत्रांत लुडबूड करीत असतो. खालसांतल्या इतर सामान्य शहरापेक्षां साताऱ्याला अधिक वैशिष्ठ्य कांहींच उरलेलें नाहीं. तेथें स्वराज्य नाहीं, स्वराज्याची अभिमानास्पद स्फूर्ति नाहीं, छत्रपति नाहीं, कोणी नाहीं. हिंदु लोक जात्याच देवभोळे असल्यामुळें, ब्राम्हणांच्या चिथावणीनें ते वाटेल त्या दगडाधोंड्याचा देव बनवून त्याच्या भजनानंदांत पृथ्वीवर स्वर्ग उतरल्याच्या कल्पनेंत तल्लीन होतात. असल्या क्षणिक तल्लीनतेंत त्यांना असेंहि वाटतें कीं

सातान्याचें दैव उदयाला आलें ! तीन चार महिन्यापूर्वी सातारचे श्रीमंत भाऊसाहेब महाराज भोसले दिवंगत झाले. ते निपुत्रिक वारल्यामुळें त्यांच्या राणीनें एक अल्पवयी मुलगा दत्तक घेतला. या दत्तविधानाचा इतका मोठ्या थाटाचा समारंभ सातारा शहरांत झाला कीं ' गेल्या १०० वर्षांत असा थाट सातान्यांत कोणी पाहिला नाहीं ' असें विश्वसनीय लोकमत आहे. बहुजनसमाजाचा आनंद तर वर्णनीय होता. ब्राम्हणांपेक्षां ब्राम्हणेतरांची दाटी अर्थात् विलक्षण दांडगी होती. भोळी बिचारी रयत ! त्यांना घटकाभर स्वराज्याचा व छत्रपतींच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचाच भास होऊन, सातान्याचें दैव पुन्हा उदयास आलें असेंच वाटूं लागलें. ब्राम्हणी कारवाईला छत्रपति प्रतापसिंहाचा बळी पडून त्याच्या गादीवर घरभेद्या आप्पासाहेब भोसला बसला. त्या वेळच्या राज्याभिषेकाच्या सुतकी थाटानंतर आज ८६ वर्षांनीं सातान्यानें हा दत्तविधानानिमित्त केलेला भव्य समारंभ पाहिला. मग आनंदाला काय पारावार ? पण हा आनंद क्षणिक आहे. नुसत्या समारंभप्रियतेचा परिणाम आहे. एक शतकपर्यंत दडपून पडलेल्या स्वातंत्र्याच्या उत्कृष्ट भावनांची ही उसाळी आहे. छत्रपतींच्या तक्ताबद्दल महाराष्ट्रियांच्या नसानसांत फुरफुरणाऱ्या निर्व्याज व निष्कलंक प्रेमाचा हा उमाळा आहे. आपलेपणाच्या तेखदार रक्ताचा हा सणसणाट आहे. पण त्या उसाळीचा आणि उमाळ्याचा आज काय उ-

वा. क्र. ३८०
ग्र. .........

योग आहे ? उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः पैकींच सारा प्रकार. मानवांची समारंभप्रियता असल्या एखाद्या विशिष्ठ प्रसंगीं आपल्या भावनांना मनसोक्त विहारासाठीं मोकळे सोडते; पण तेवढा समारंभ झाल्या नंतर पुढें काय ? तात्पुरता आनंद, त्याची तात्पुरतीच फलश्रुति. आज सातारा हें स्वतंत्र संस्थान नाहीं, तेथें स्वराज्य नाहीं, आणि छत्रपतीहि नाहीं अर्थात् दत्त विधानानिमित्त परवां तेथें झालेल्या भव्य समारंभांत, हत्ती वरल्या मिरवणुकींत आणि त्या नाटकी दरबारांत, भिक्षुकी कारस्थानामुळें पालथें पडलेलें साताऱ्याचें दैव यत्किंचितहि उलटें सुलटें होण्याचा संभव नाहीं. दगडा धोंड्यांना शेंदूर फासून त्यांना देवकळा आणण्यांत पटाईत असलेल्या हिंदुजनांना, केवळ आपल्या भावनांच्या खुषीसाठीं, वाटेल त्या व्यक्तीपुढें ' छत्रपति---महाराज---सरकार---मायबाप ' म्हणून लोटांगणें घालण्यास कांहींच अडचण पडत नसते. पण या नुसत्या लोटांग णांनीं स्वराज्य किंवा छत्रपति निर्माण होते तर पृथ्वीचा स्वर्ग व्हायला कांहींच अवधि लागता ना. सारांश, परवा साताऱ्यास झालेल्या दत्तविधान समारंभानें साता ऱ्याच्या दैवांत जरी कांहीं फेरबदल झाला नाहीं, तरी दत्तक वरलेल्या भाग्यवान मुलाच्या दैवाचा सतारा मात्र कुतुहल उत्पन्न करण्यासारखा आहे खास.

इतिहासाकडे पाहिलें तर असें दिसून येतें कीं शिव छत्रपतीचा वंश म्हणजे दत्तविधानाच्या बाबतींत अनेक

व्यक्तींना दैवाचा सतारा ठरलेला आहे. या वंशांतील कांहीं दत्तविधानें राजकारणी बळजबरीचीं झालीं, तर कांहीं वाडीबंदरच्या एखाद्या भिकार्‍या पांडबाला घोड्याच्या शर्यतींत लाख रुपयांचें टिकीट लागण्या सारखी झालीं. नुसत्या अस्सल रक्ताच्या भांडवलाचाच विचार केला तर कित्येक भोसलेजे एकदां परिस्थितीच्या प्रवाहांत अज्ञात कोपर्‍यांत पडले ते पडले, आणि भलतेच घराणेवाले भोसले बनले. सातार्‍याच्या शाहू छत्रपतीनंतर जेवढे दत्तविधानी छत्रपति गादीवर आले, त्यांच्या शेळपटपणाला हा दत्तविधानी दैवाचा सताराच मूळ कारण झालेला आहे. शाहू छत्रपति करवीरकरा सारख्या अचाट बुद्धिमत्तेच्या एक दोन व्यक्ति बाद केल्या, तर बाकीचे सर्व छत्रपति म्हणजे दैवाच्या झोल्यांत हेलकावे खाणारे व भोसल्यांचा वंश कसा तरी आडनांवी पुण्याईवर पुढें चालविणारे प्राणी होते, यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. कै० भाऊसाहेब महाराज सुद्धां याच पंक्तींतले. अलीकडे एक दोन ठळक प्रसंगीं पुण्यां तल्या भिक्षुकी पत्रकारांनीं त्यांना छत्रपति, छत्रपति म्हणून जें विशेष उचलून धरलें होतें, ते सातार्‍याच्या किंवा छत्रपतीच्या घराण्याच्या अभिमानानें नसून केवळ ब्राम्हणेतर पक्षाच्या चुरशीनें होय. ब्राम्हणेतरांनीं करवीर कर खर्‍याखुर्‍या स्वयंशासित छत्रपतीला आपला पुढारी मानला, तर भिक्षुकांनीं तोंडीस तोंड म्हणून सातार्‍याच्या मांदीतला छत्रपति उजाळा देऊन पुढें मांडला. ब्राम्हणे

३२०

तरांचें कोल्हापूर, तर भिक्षुकांचा सातारा, ही म्हण कांहीं आजकालची नाहीं. फरक एवढाच कीं सातारचा छत्रविरहित छत्रपति भटांचा गुलाम असतो आणि करवीरचा छत्रपति भटांनीं गुलाम बनविलेल्या कोट्यवधि मूक रयतेच्या हृदयावर स्वयंनिर्णयी आत्मोद्धाराचें छत्र धरून त्यांना स्वावलंबनाच्या चैतन्यांत रंगवून सोडतो. सातारच्या भोसले घराण्याबद्दल भिक्षुकी प्रेमाचा लोंढा केवढा गिरसप्पी आहे, हें कांहीं नव्यानें कोणाला सांगणें नको. पण कै० भाऊसाहेब व त्यांच्या आसपास असणारी कारस्थानी कुत्रीं माकडें जात्याच भटांची पायचाटी करणारीं असल्यामुळें, भिक्षुकी छावण्यांत भाऊसाहेब महाराजांचा बोलबाला दक्षिणेच्या भरती ओहटीप्रमाणें कमी अधिक घुमत असे, यांत कांहीं नवल नाहीं.

कै. भाऊसाहेब भोसल्यांनीं दत्तकाच्या पसंतीसाठीं अनेक तरुणांना आपल्याजवळ ठेऊन घेतलें, त्यांची तैनात चालविली, पण अखेरीं दत्तविधान न होतांच ते दिवंगत झाले. या पांच सहा तरुणांनीं कै. भाऊसाहेबांच्या हयातींत खाण्यापिण्याची खूप मजा मारली, पण बेट्यांचें दैव तितकेंच. समर्थ रामदासांच्या ब्रह्मचर्याचा च[illegible]वाढी सूड एकामागून एक अशा सात बायका करून घेणाऱ्या चाफळ मठाधिशाच्या मांडीवर दरबारांत बसण्याचें त्यांचें भाग्य नव्हतें. त्यांच्या उलट्या अंबारीच्या नशिबाच्या कवटींत अंबारीचा हत्ती नव्हता. हा दैवाचा सतारा साताऱ्यांतहि नव्हता. तो भाटघरच्या धरणावर

भिरभिरत होता. तो जलमंदिरांत आपल्या आयुष्याचे दिवस मोजीत पडलेल्या भाऊसाहेब भोसल्यांच्या निर्णयांत नव्हता, तो भाटघर धरणावर पोटासाठीं राबणाऱ्या मजुरांच्या झोपड्या झोपड्यांतून भटकत होता. त्या दैवाच्या सताऱ्याची छाया साताऱ्च्या राजवाड्यांतल्या मिष्टान्नावर नव्हती, ती हातावर मिळवून तळहातावर खाल्ल्या जाणाऱ्या कदन्नावर होती. ती दत्तविधानाच्या उमेदवारीवर नव्हती, ती कल्पनेलाहि चकविणाऱ्या अकस्मातांत दडलेली होती. हा दैवाचा सतारा 'लकी' नव्हता, 'लकी' होता. तो तारुण्यावर भाळणारा नव्हता, तो एका बालमूर्तीवर—मल्हारराव होळकराच्या मस्तकावरील नागाच्या फडेप्रमाणें—डुलत होता. तो नुसता 'वंशाला आधार' शोधीत नव्हता, तर भोसल्यांच्या औरस बीजाला व अस्सल रक्ताला धुंडीत होता. हें रक्त अज्ञात दशेच्या कवचाखालीं दडलें होतें. हें बीज दारिद्र्याच्या उकीरड्यांत गाडून पडलें होतें. राजवैभवी कल्पनेला तें पूर्ण पारखें झालें होतें. परिस्थितीच्या दणक्यांनीं त्याचा भूतकाल अंधःकारमय बनला होता, आणि त्याला भविष्य काळ तर मुळींच माहीत नव्हता. वर्तमानकाळांत 'भोसले' या आडनांवापलीकडे त्याला कशाचीही दाद नव्हती. मागें पुढें अंधार व दृष्टीपुढें दारिद्र्य, यापलीकडे जगाची कसलीच कल्पना नव्हती. कांहीं र—ट—फ शिकणें झालें तर शिकावें; नाहीं तर दणकट मनगटाची मजुरी करून पोट भरावें, यापेक्षां अधिक कसल्याहि

महत्वाकांक्षेची पुसटसुद्धां ओळख त्याला नव्हती. सातार्‍याच्या दैवाच्या जरी ठिकर्‍या ठिकर्‍या उडालेल्या असल्या तरी या बालमूर्तीच्या दैवाचा सतारा मात्र मोठा जबर. बापाची सारी हयात भाटघर धरणाच्या स्टोअर्स खात्यांत मजुरी करण्यांत गेली, तरी मुलाच्या दैवानें त्याच्या कोंड्याच्या भाकरीचा मांडा झाला. दुपारी बारा वाजले म्हणजे आईनें बांधून दिलेली झुणका भाकरीची शिदोरी बापाला नेऊन पोहोंचविणारा गरीब 'चंदर्‍या' सातारच्या भोसले घराण्याचा श्रीमंत सरदार होणार हें खुद्द आईबापालाच उमगलें नाहीं, तर इतरांची तरी काय कल्पना असणार? भाऊसाहेब भोसले जिवंत असतांना जरी हा मुलगा त्यांच्यापुढें उभा केला असता, तरी त्याच्या बाह्य वेषानें त्यांच्या मनांत निवडणुकीची प्रेरणा झालीच असती, असें सांगतां येणार नाहीं. दैवाचा सतारा आपल्या ठराविक धाटणीनेंच परिपक्व होत असतो. जेथें ज्योतिषी बुवांची अक्कलच लोळपाटणी खातें तेथें कुंडलींतल्या ग्रहांचीं गृहें परळ महालक्ष्मीच्या सिमेंट चाळीप्रमाणें बिनचुक ओसाड पडलेली दिसल्यास त्यांत नवल नाहीं. ज्याच्या जन्मापासून आज सात वर्षें जगानें या मुलाची कसलीच दाद घेतली नाहीं, तोच मुलगा एकदम श्रीमंत शाहू महाराज भोसले म्हणून सातारा शहरांत हत्तीवर मिरविला जातो, हा चमत्कार 'भविष्य' म्हणून वर्तविणारा एकहि ज्योतिषी महाराष्ट्रांत जिवंत आढळूं नये, हें दैववाद्यांचें दैव का ज्योतिषशास्त्राचा फोलकटपणा?

आकाशस्थ " रेवतीवर दृक्प्रत्ययी नजरबाजीचे डोळे मारणाऱ्या कुंडलीबहाद्दरांनीं आतां तरी जागे होऊन या दैवाच्या सताऱ्यानें साताऱ्याचें दैव उदयास येईल कीं नाहीं, याचे फल ज्योतिष्य वर्तविण्याची लगबग करावी. नाहीं तर भविष्यानें भूताचीं पाटलूण चढविल्यावर वर्तमान काळाच्या पेशवाई झग्यांत ठोकताळ्याचे ढेंकूण शोधण्याचा तडफडाट..जगाच्या उपहासाला मात्र पात्र होईल, हें या पंचांगपंडितांना सांगितलेंच पाहिजे काय ?

सात वर्षांचा चंद्रसेन भोसला केवळ आपल्या नसांतल्या रक्ताच्या पुण्याईवर साताऱ्च्या जहागिरीचा श्रीमंत जहागिरदार झाला. या अकल्प्य घटनेच्या साताऱ्या जनतेला कल्पनातीत आनंद वाटला आणि तो तिनें न भूतो न भविष्यति अशा थाटानें व्यक्तहि केला. दत्तविधान, दरबार, हत्तीवरील मिरवणूक वगैरे समारंभांनीं सातारा राजधानीचा आनंद गगनांत मावेना. त्यांतच ब्रिटीश सरकारनें या सर्व कृत्यांना आपली सार्वभौमी सहानुभूती दाखविल्यामुळें तर या आनंदाला पारावारच उरला नाहीं. पण हा आनंद अपूर्ण आहे. हा आनंद खेदमिश्रित आहे. या आनंदांत निराशेच्या वेदना आहेत. हा आनंदी वर्तमानकाळ दुःखमय भूतकाळांतील अनेक दुर्दैवी घटनांनीं व्यथित झालेला आहे. आनंदाच्या या विरळ आवरणाखालीं अनेक राष्ट्रद्रोही कारस्थानांचीं पिशाचें नंगानाच घालीत असलेलीं अजूनही आपल्याला दिसतात. या आनंदाच्या देखाव्याचा पार्श्वभाग काळा

कुद्र असल्यामुळें विरोधाभासानें त्याची रुची विद्यमान सातारकरांना अमृतापेक्षांही जरी गोड वाटत असली, तरी त्या रुचींत मिसळलेला आत्मद्रोहाच्या जहराचा फणफणाट अजूनही विचारवंतांच्या विचारांत विलक्षण खळवळाट उडवीत आहे. चिरंजीव शाहू महाराज भोसले आज ज्या गादीवर दैवाच्या सताऱ्यानें अधिष्ठित झाले आहेत, त्याच गादीवरून प्रतापसिंह छत्रपतीला ४ सप्टेंबर १८३९ रोजीं रात्रीं भर १२ वाजतां उघड्या नागड्या स्थितींत हद्दपार व्हावें लागलें आहे, ही गोष्ट नजरे आड केली तरी हृदयफलकावरून पुसून टाकतां येत नाहीं. ही गादी महाराणीच्या अनुपमेय स्वार्थत्यागावर राजाराम छत्रपतींच्या हस्तें जरी स्थापन झालेली आहे, तरी तिच्यावरील प्रत्येक छत्रपति पेशव्यांच्या भिक्षुकी कारस्थानाला बळी पडलेला आहे, ही गोष्ट विद्यमान मातुश्री ताराबाईसाहेब यांनीं विसरून भागावयाचें नाहीं सातारच्या गादीला भिक्षुकी वर्चस्वाचें कायमचें ग्रहण न लागतें तर मुंबईच्या टोपकर वनिया कंपनीची प्रताप-सिंह छत्रपतीच्या आंगाला हात लावण्याची काय छाती होती ? ज्या मराठ्यांनीं जिंजीचें राजकारण लढवून औरंग-जेबासारख्या कर्दनकाळ दैत्याची मुत्सद्देगिरी आणि लष्करी डावपेच, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच ठेचून जमीनदोस्त केले, तेच मराठे वीर आपल्या छत्र-पतीला पापस्मरण बाळाजीपंत नातू आणि कर्नल ओव्हान्स यांनीं दंडाला धरून तक्तावरून खेचून हद्दपार

करतांना नामर्द हिजड्याप्रमाणें स्वस्थ कसे आणि कां धूसलें? त्यांच्या तलवारीचीं पातीं आणि भाल्याचीं फाळें एकदम अवचित बोथट कां पडलीं? त्रिखंडविश्रुत मराठ्यांचा दरारा त्याच काळरात्रीं कमकुवत कसा झाला? या प्रश्नांचीं उत्तरें, ताराबाई मासाहेब, आपण आपल्या हृदयाला विचारा, म्हणजे आपल्या युवराजाच्या दैवाचा सतारा यापुढें कोणत्या शिस्तीनें वळविला पाहिजे याची आपल्याला पूर्ण जाणीव होईल. आजहि आपल्या भोंवतीं स्वार्थी लाळघोट्या कारस्थान्यांचा गराडा पडलेला आहे. त्यांच्या कारवाईची योग्य वेळींच वाट लावली नाहीं, तर आपल्या युवराजाच्या दैवाच्या सतार्‍याची वाट ठरल्यासारखीच म्हणावी लागेल. भिक्षुकी वर्चस्वाचें जंतर मंतर आपल्या काळजाला आरपार भिनून तें जर थंडगार पडलें असेल, तर ज्या तक्तावर आज आपण एका भाग्यवान युवराजाची स्थापना केली आहे, त्या तक्तापुढें येत्या ४ सप्टेंबर रोजीं मध्यरात्रीं आपण शांत चित्तानें चिंतन करीत बसा म्हणजे त्या तक्ताच्या हृदयांतून पिळवटून बाहेर पडणार्‍या रक्ताच्या चिळकांड्या आपल्या व आपल्या युवराजाच्या वास्तविक स्थितीची आपणांस पूर्ण कल्पना करून देतील. वंश-संपन्न आप्पासाहेब सांगलीकर आणि चित्पावन आयागो बाळाजीपंत नातू यांच्या उलट्या काळजाच्या धर्मकारणाला आपल्या ऊर्ध्वमुखी राजकारणाची फोडणी देऊन बनिया कंपनीनें त्या तक्ताला दिलेला भडाग्नी जड

सृष्टींत आपल्या लौकिकी डोळ्यांना जरी दिसत नसला किंवा आपल्या पूज्यपतींच्या गादीखालीं तो असला नसला, तरी तो झिझवण्यासाठीं आणि महाराष्ट्राच्या हृदयांत चिरकाल विराजमान झालेल्या शिवछत्रपतींच्या शिवतक्ताच्या पुनरुज्जीवनासाठीं, एक दोन नव्हे तर सतत १४ वर्षे विलायतेस रंगो बापूजीनें लढविलेला प्राणांतिक झगडा, आणि सरते शेवटीं सत्तावन सालीं मऱ्हाठशाहीनें अवघ्या हिंदुस्थानाला पाठीशीं घालून दिल्लीच्या समरांगणावर केलेला अखेरचा मर्दानी थैमान याचा चित्तवेधक, स्फूर्तिदायक परंतु हृदयाचें पाणी पाणी करणारा खेदजनक इतिहास तें तक्त आपणांला, मासाहेब, मोठ्या आवेशानें खास खास कथन करील. ज्या तक्तावर चिरंजीव शाहूमहाराज आपल्या दैवाच्या सताऱ्यानें बसले आहेत, त्या तक्ताखालीं ब्राम्हणेतरांच्या सर्वांगीण प्रबोधनाचा प्रश्न अर्धवट मेल्या स्थितींत कण्हतकुंथत पडलेला आहे. त्या तक्ताच्या खालीं प्रतापसिंहाच्या सैन्याधिकाऱ्यांच्या धेंडाईबरोबरच भोसले घराण्यांतल्या राजस्त्रियांच्या किंकाळ्या आपल्याला अजून ऐकूं येतील. त्या तक्ताच्या खालीं ब्राम्हणांच्या राष्ट्रद्रोहाबरोबरच आप्पासाहेब भोसल्याचा घरभेद, आप्पा शिदकराचा हरामखोरपणा, तात्या केळकराचे खोटे शिक्के, नागोदेवरावची भिकी सोनारीण, भोरचे संतपचीव वगैरे अनेक वीररत्नांच्या कारस्थानांचें देखावे, ताराबाईसाहेब, आपल्याला त्या रात्रीं स्पष्ट दिसूं लागतील.

छत्रपतीच्या तक्ताला पेशवाई वळणाचें भिक्षुकी ग्रहण कसें लागलें, ब्राम्हण ब्राम्हणेतर वादामुळें अभिमाना ऐवजीं स्वदेशद्रोहाचें बाळकडू मऱ्हाठे कसे प्याले आणि कायदेबाजीच्या सबबीवर बनिया कंपनीनें सातारच्या या पूज्य छत्राचे तीन तेरा आपल्याच लोकांच्या हातून कसे वाजविले, या सर्व गोष्टींचा आपण नीट मननपूर्वक अभ्यास केला, आणि त्या दिशेनें युवराजाच्या आत्म प्रबोधनाच्या मार्ग आखलांत, तर केवळ काकतालीय न्यायानें घडून आलेल्या आपल्या चिरंजीवांच्या दैवाच्या सताऱ्याबरोबरच साताऱ्याचें दैवसुद्धां उदयास येण्याची आशा अजून नष्ट झाली नाहीं, असें आशाखोर मानवी मनाला वाटत असल्यास तो आशावाद खात्रीनें निंद्य गणला जाणार नाहीं, अशी आम्हाला आशा आहे.

इतिहास कसाही उलट सुलट वाचला आणि राजकारणाची लांगडी कशीही उलथीपालथी करून चोखाळली तरी एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, अवघा महाराष्ट्र सातारा राजधानीकडे कांहीं एका वर्णनीय भावनेनेंच नेहमीं पाहात असतो. आज या देवळांतला देव जरी नष्ट झाला असला तरी त्याची पडकीं भिताडें आणि रडके बुरूज त्या देवाची आठवण त्यांच्या हृदयात क्षणोक्षणीं उंच वळवीत असतात. सातारच्या छत्रपतीच्या उच्चाटणाचें पाप जितकें स्वकीयांच्या पदराला बांधता येईल, तितकेंच तें ईस्ट इंडिया कंपनीच्या पाटलोणीलाही भिडवितां येईल. जितक्या प्रमाणांत आमचे देशबंधु या कामीं जबाबदार

ठरतील, त्यापेक्षां शतपट प्रमाणांत या पापाचा वाटा ब्रिटिश सरकारच्या मूळमाया कंपनीला—अर्थात् ब्रिटिश राष्ट्रालाही घ्यावा लागेल. प्रतापसिंह छत्रपतींचें उच्चाटण हा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरला कधींही न पुसला जाणारा कलंक आहे, अशा प्रकारचे तत्कालीन ब्रिटिश मुत्सद्यांचे अभिप्राय आज कागदोपत्रीं प्रसिद्ध आहेत. हिंदु लोकांनीं राष्ट्रद्रोह केला, तर ब्रिटिशांनीं अन्याय केला, असा या प्रकरणाचा सारांश निघतो सर्वांचीच त्यावेळीं बुद्धी फिरली, म्हणून शिव छत्रपतीची सातारा राजधानी खालसा होऊन तेथील भोसल्यांना नुसत्या साध्या जहागिरीवर संतुष्ट राहण्याची वेळ आली. आज काळ बदलला आहे. फाटलेल्या मनोवृत्ति सांधण्याचा सर्वत्र प्रयत्न होत आहे. हिंदी व ब्रिटिश लोकांचे संबंध समरस करण्याचे श्लाघ्य प्रयत्न चालू आहेत. गतेतिहासाचा कसलाहि विकल्प मनांत न आणतां, मराठे वीरांनीं गेल्या महायुद्धांत ब्रिटिशांच्या अब्रूसाठीं फ्रान्सच्या समरांगणावर सांडलेलें रक्त अजून लालबुंद चमकत आहे. अशा परिस्थितींत अखिल मराठ्यांना अमरावतीप्रमाणें प्रिय असलेली सातारा राजधानी, जर या नव्या मन्वंतरांत पुनश्च स्वतंत्र मऱ्हाठी संस्थानाच्या पुनरुज्जीवनाला पात्र होईल, ब्रिटिश न्यायदेवता जर साताऱ्याच्या शिवछत्रपतींच्या परमप्रिय गादीची पुनर्घटना करील, तर त्यामुळें 'शिवराया प्रणिपात कराया' ब्रिटानियेनें आपल्या उद्यांच्या बादशहाला हिंदुस्थानांत पाठवून जो कृतज्ञ भाव व्यक्त केला, त्या भावनेला कांहीं

तरी अर्थ आहे, असें महाराष्ट्र समजेल. आज हा विचार कित्येकांना रुचणार नाहीं. अनेकांना ही कल्पित कादंबरी वाटेल. बरेंच विचारवंत याला स्वप्न म्हणतील. परंतु जेथें जेथें खरें मर्दानी मऱ्हाटी हृदय धमधमत असेल तेथें तेथें हा साताऱ्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न काळजाला जाऊन भिडल्याशिवाय कधींही राहणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. भांबुर्ड्याच्या धोंड्यावर कसलें तरी कांहीं तरी स्मारक उभारण्यापेक्षां सातारच्या संस्थानचें जर आज पुनरुज्जीवन होईल, तर महाराष्ट्राप्रमाणेंच ब्रिटानियेलासुद्धां एका महत्पातकाचें प्रायश्चित्त मोठ्या आवांत घेण्याची मंगल पर्वणी प्राप्त होईल. ब्रिटिशां सारख्या सर्वसमर्थ, धूर्त व कदरबाज राष्ट्राला महाराष्ट्राची जर कांहीं कदर वाटत असेल, मराठ्यांच्या आत्मयज्ञाची त्यांना बूज राखावयाची असेल, तर तिवाठ्या तिवाठ्यावर दगडाधोंड्याचीं स्मारकें उभारण्यापेक्षां हैसूर,काशी वगैरे खालसा झालेल्या कांहीं संस्थानचें जसें त्यांनीं पुनरुज्जीवन केलें, तद्वत सातारच्या छत्रपतींचें व त्यांच्या पुरातन तक्ताचें पुनरुज्जीवन केल्यास मर्द मराठ्यांच्या हृदयांत आपलेपणाविषयीं भावना जागृत केल्याचें श्रेय त्यांना खास मिळेल. ही अशक्य कोटींतील गोष्ट नव्हे. ही ब्रिटिशांना सहजशक्य गोष्ट आहे. ही न्यायाची मागणी आहे. कृतकर्माचें प्रायश्चित घ्या आणि सत्याची लाज राखा, असा हा उघडाउघड सवाल आहे. रात्रंदिवस शल्याप्रमाणें हृदयांत डाचत असलल्या असं

गल गतेतिहासाला पुनरुज्जीवनाच्या मंगल कार्यानें पावन करा, असा हा न्याय्य मागणीचा अर्ज आहे. या कामीं ब्राम्हणब्राम्हणेतरांनीं एकवटून कार्याला सुरवात केल्यास त्यांच्या पूर्वजांनीं छत्रपतींच्या उच्चाटणाचें जें दुष्कृत्य केलें त्याच्या पापापासून त्यांची मुक्तता होईल आणि सातारा ही इतर देशी संस्थानांप्रमाणें पुनरुज्जीवित अशा शिव छत्रपतीची शिवनगरी झाली, तर तो मंगल सोहाळा महा राष्ट्राला त्याचप्रमाणें ब्रिटिश लोकांना मोठ्या अभिमानाचा सत्यप्रियतेचा आणि न्यायप्रियतेचा म्हणून भावी इति हासांत रेडियमच्या अक्षरांनीं चिरंजीव होऊन बसेल.

साताऱ्याची शिवनगरी बनविण्यासाठीं ब्राम्हणांनो, पूर्वग्रहांना विसरून एकनिश्चयानें तुम्ही तयार व्हा; कारण तुमच्या पूर्वजांनीं केलेल्या कर्माचें प्रायश्चित्त तुम्हांला घ्यावयाचें आहे. तें या उमद्या मार्गानें घ्या. यांत सारें जग तुमच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करील. तुमच्या पाप भीरुत्वाची इतिहास ग्वाही देईल. ब्राम्हणेतरांनो, क्षत्रिय मराठ्यांनो तुम्हांला शिवस्मारक पाहिजे ना? मग त्या भांबुर्ड्याच्या धोंड्यावर डोकी फोडण्यापेक्षां या अभिनव शिवनगरीच्या उद्धारासाठीं तुम्ही आपलीं डोकीं अवश्य चालवा. आज तुम्हांला अस्सल भोसले कुळांतला एक बालवीर दैवाच्या सताऱ्यानें साताऱ्याचें दैव गदगदा हालविण्यासाठीं अकस्मात प्राप्त झाला आहे. या संधीचा फायदा घेऊन तुम्ही शिवनगरीचा जर ध्यास घ्याल आणि प्रबोधनाच्या कल्पनेंत खेळणारी ही कल्पनासृष्टी प्रत्यक्ष अस्तित्वांत आण

ण्याचा प्रयत्न कराल, तर बंदिवासाच्या हाल अपेष्टांत काशीला मरण पावलेला प्रतापसिंह छत्रपती आणि त्यांच्या नांवासाठीं व तक्तासाठीं अनुपमेय आत्मयज्ञ करणारा रंगो बापूजी यांच्या स्वर्गस्थ आत्म्यांना खात्रीनें संतोष वाटेल. सरतेशेवटीं ब्रिटिश राजकर्त्यांना आमची अशी विनंति आहे कीं, सातान्याच्या पुनरुज्जीवनाचा हा प्रश्न आपण आतां ही जर न सोडविला तर सत्य, न्याय आणि माणुसकी या तीनही तत्त्वांच्या दृष्टीनें ती एक मोठी नामुष्कीची गोष्ट होईल, असें छातीठोक विधाने करण्यापुरता पुरावा गतेतिहासांतून आम्ही लागेल तितका काढून देऊं. ब्रिटिशांना महाराष्ट्राच्या मनोभावनेची जर कांहीं दरकार असेल तर त्यांनीं हा शिवनगरीचा प्रश्न अवश्य विचारांत घ्यावा. सद्दीच्या जोरावर छत्रपतींचे तहनामे रद्दी ठरविले गेले; जाऊं द्या. तत्कालीन रेसिदंटांनीं गव्हर्नरांचीं मनें, ब्राम्हणांच्या चिथावणीनें, कलुषित केलीं; करूं द्या. रंगो बापूजीच्या १४ वर्षांच्या विलायती वनवासाला यश आलें नाहीं; न येऊं द्या. अनेक ब्रिटिश मुत्सद्यांची न्यायबुद्धी व सत्यप्रियता त्या वेळीं वांझोटी ठरली; ठरूं द्या. भूत काळ मेला; मरूं द्या. भविष्याकडे लक्ष द्या. भूतकाळच्या भूतांना वर्तमानकाळांत गति देऊन, भविष्य काळाला उज्वल करा. शिवरायाला नुसता मुजरा करूं नका; त्याचें जिवंत स्मारक करा. प्रतापसिंह छत्रपतीची पदच्युतता म्हणजे अखिल महाराष्ट्राच्या काळजांत खोल घुसलेला आंग्रेजी जंबिया आहे. तो एक अन्याय आहे.

ती एक सत्याची बेगुमान मुस्कटदाबी आहे. तो जंबिया आतां खेचून काढा. तो महाराष्ट्राचा अपमान आतां पुसून टाका. लढाईंत जिंकलेलें टिपू वाघाचें राज्य ज्या ब्रिटीश सरकारनें वडेयार हिंदु घराण्याला परत देऊन म्हैसूरचें राज्य पुनरुज्जीवित केलें; काशीच्या राज्याची पुनर्घटना केली, त्याच ब्रिटानियेला शिवरायाचें मूळ तख्त पुनरुज्जीवित करायला फारसें कठीण नाहीं. ब्रिटानिये! तुझ्यासाठीं मऱ्हाठ्यांनीं आपली उमलती जवान पिढी युरपच्या रणयज्ञांत बळी दिली आहे, हें विसरूं नकोस. तुझ्या उद्याच्या नृपतीनें व हिंदुस्थानाच्या बादशहानें आमच्या शिवदेवापुढें टोपी काढून मुजरा केला आहे, हें लक्षांत घेऊन, सातारच्या अन्यायाचें परिमार्जन करायला या वेळीं तूं तुझ्या इतिहासप्रसिद्ध न्यायबुद्धीचा उपयोग धोरणानें करशील अशी आशा आहे.

# हिंदवी स्वराज्याचा खून.

[ ता. २९ एप्रील १९२२ रोजीं सातारा येथें श्रीशिवजयंत्युत्सव प्रसंगीं श्री. ठाकरे यांनीं दिलेलें व्याख्यान.]

भगिनीबांधवहो, आज आपण पुण्यश्लोक श्रीशिवाजी महाराज यांचा जन्मदिवस साजरा करण्याकरितां जमलों आहों. आजचा दिवस अत्यंत मंगल, अत्यंत पवित्र, आणि स्फूर्तिदायक असा आहे. या दिवशीं गुलाम महाराष्ट्राला स्वतंत्र करणारा, नामर्द मऱ्हाठ्यांना मर्द बनविणारा आणि नांगरहाक्या अनाडी शेतकऱ्यां-तून भीष्मार्जुनकर्णापेक्षांहि सवाई भीष्मार्जुन निर्माण करणारा राष्ट्रवीर जन्माला आला. अर्थात् अशा मंगल प्रसंगीं ' शिवरायास आठवावें ' या विषयानुरूप शिवचरित्राबद्दल मीं कांहीं विवेचन करावें अशी आपली अपेक्षा असणें साहजिक आहे व तसा माझाहि उद्देश होता. परंतु पाडळीला मोटारींत बसून मी साताऱ्याकडे येऊं लागतांच माझा तो बेत बदलला. शिवरायास आठवतां आठवतां सबंध शिवशाहीचा [illegible] माझ्या अंतश्चक्षूसमोर भराभर फिरूं लागला; आणि साताऱ्याच्या या निमकहराम स्वराज्यद्रोही राज-धानींत मी येऊन दाखल होतांच, शिवाजीनें स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या अंतकाळचा भेसूर देखावा मला स्पष्ट दिसूं लागला. बांधवहो, आपण सातारकर असल्यामुळें आपल्याला

सातारचा अभिमान असणें योग्य आहे. क्षमा करा, मला तितका त्याचा अभिमान नाहीं. सातारा ही पापभूमी आहे. सातारा ही हिंदवी स्वराज्याची ऱ्हासभूमी आहे. रायगडावर उदय पावलेल्या हिंदवी स्वराज्याचा सूर्य या साताऱ्यास अस्त पावला. रायगडाला जन्माला आलेल्या स्वराज्याच्या नरडीला नख देऊन भिक्षुकशाहीनें या साताऱ्यास त्या स्वराज्याचा मुडदा पाडला. दिल्लीच्या मोंगल बादशाहीच्या सिंहासनाला गदगदा हालविणाऱ्या, इतकेंच नव्हे, तर अटकेपार रूमशामच्या बादशाही तख्ताचा थरकांप उडविणाऱ्या हिंदवी स्वराज्याचें रक्त या सातारच्या पापभूमीवर सांडलेलें आहे. शिवछत्रपतीच्या विश्वव्यापी मनोरथाचा ज्या भूमींत नायनाट झाला, त्याच भूमीवर उभे राहून आजच्या मंगल प्रसंगीं पुण्यश्लोक शिवरायाचें गुणगायन करण्यापेक्षां, आमचं हिंदवी स्वराज्य कां नष्ट झालें, त्याच्या गळ्याला कोणकोणत्या अधमांनीं नख लावलें आणि भिक्षुकशाहीनें कोणकोणतीं घाणेरडीं कारस्थानें करून आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मुडदा या साताऱ्यांत पाडला, त्याचा आज जर आपण इतिहासाच्या आधारानें विचार केला, तर सध्यांच्या स्वराज्योन्मुख अवस्थेंत आपल्याला आपल्या कर्तव्याचीं पावलें नीट जपून टाकितां येतील. स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असलीं तात्त्विक पुराणें सांगणारे टिळकानुटिळक आज पैशाला खंडीभर झाले आहेत. परंतु त्याच जन्मसिद्ध हक्कावर खरखरीत निखारे ठेवण्यास ज्या हरामखोरांची मनोदेवता महाराष्ट्रद्रोहाचा व्यभिचार करण्याच्या कामीं किंचित्सुद्धां शरमली नाहीं, त्यांचा खराखुरा इतिहास उजे-

डांत आणणारे मात्र आपल्याला मुळींच भेटणार नाहींत. आज स्वराज्य शब्दाचें पीक मनमुराद आलेलें आहे. फंडगुंडांच्या पोतड्या भरण्यासाठीं स्वराज्य हा एक ठगांचा मंत्र होऊन बसला आहे. परंतु स्वराज्य म्हणजे काय याची व्याख्या मात्र कोणीच स्पष्ट करीत नाहीं. अशा प्रसंगीं आपलें हिंदवी स्वराज्य आपण कां गमावलें, याचा नीट विचार केल्यास सध्यां महाराष्ट्रभर धुमाकूळ घालीत असलेल्या राष्ट्रीय गुंडांच्या स्वराज्यविषयक चळवळींत ब्राम्हणेतर संघानें किती जपून वागलें पाहिजे याचा खुलासा तेव्हांच होईल. राष्ट्रीयांची स्वराज्य–पुराणें म्हणजे गांव-भवानीचीं पातिव्रत्यावरील व्याख्यानें आहेत; कारस्थानी वेदांत आहे; ठगांची ठगी आहे; स्वार्थसाधूंचा मायाजाल आहे. शिव-रायास आठवावें; गोष्ट खरी ! परंतु आज शिवछत्रपतींचें स्मरण होतांच त्यांच्या हिंदवी स्वराज्याच्या ऱ्हासाचें पृथक्करण करण्या-कडे आपली स्मरणशक्ति वळते, त्याला इलाज काय ?

तेव्हां आपण आतां छत्रपति प्रतापसिंह महाराज यांच्या कार-कीर्दीकडे वळूं. प्रतापसिंह हे एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीचे करवीरकर शाहू छत्रपति होते. १८१८ सालीं रावबाजीचें व त्या-बरोबर पुण्यांतल्या पेशवाईचें उच्चाटन पापस्मरण बाळाजीपंत नातूनीं केल्यानंतर ईस्ट इन्डिया कंपनीनें प्रतापसिंह महाराजांना त्यांच्या पूर्वजांच्या सिंहासनावर स्थापन केलें. यापूर्वीं येथील नजिकच्या वासोटा किल्ल्यावर प्रतापसिंह महाराजांना निमकहराम कृतघ्न पेशव्यांनीं सहकुटुंब सहपरिवार अनेक वर्षें कैदेंत ठेवलेले होते. सिंहासनाधिष्ठित होतांच, महाराजांनीं राजकारणाची यंत्र

रचना टाकठीक बसविल्यानंतर,ब्राम्हणेतरांच्या सामाजिक व धार्मिक उन्नतीचा प्रश्न त्यांनीं हातीं घेतला. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ब्राम्हणेतरांच्या उन्नतीचा जो प्रश्न करवीरकर छत्रपतीनीं सध्यां हातीं घेतलेला आहे, तोच प्रश्न प्रतापसिंह महाराजांनीं हातीं घेऊन दीनदुनियेला ब्राम्हणांच्या कारस्थानी भिक्षुकशाही बंडापासून मुक्त करण्याचा विडा उचलला. ब्राम्हणेतरांच्या अज्ञानावर मनमुराद चरण्यास सोकावलेल्या पेशव्यांच्या अभिमानी भिक्षुकांना महाराजांची ही चळवळ कशी बरें सहन होणार ? ती हाणून पाडण्यासाठीं भिक्षुकशाहीनें कमरा कसल्या. त्यावेळीं या कंपूचें पुढारपण स्वीकारण्यासाठीं पुढें झालेले त्यावेळचे ' लोकमान्य ' म्हटले म्हणजे पापस्मरण बाळाजीपंत नातु हे होत. इंग्रजांकडून मिळणाऱ्या जहागिरीच्या लचक्योला लालचटलेल्या ज्या अधमानें स्वजातिवर्चस्वाच्या शनवारवाड्यावर इंग्रजांचा बावटा फडकवायला मागें पुढें पाहिलें नाहीं, तो चांडाळ छत्रपतीच्या ब्राम्हणेतर संघाला उन्नतीचा एक श्वास देखील कसा घेऊं देईल ?

असले हे लोकमान्य नातु शेंडी झटकून पुढें सरसावतांच त्यांच्या पाठीमागें चिंतामणराव सांगलीकर, बाळाजी काशी किंबे, बाळंभट जोशी, बाळकोबा केळकर, नागो देवराव, भोरचे पंत सचीव, कृष्णाजी सदाशिव भिडे, सखाराम बल्लाळ महाजनी, महादेव सप्रे, भाऊ लेले, (एक मावळा:—अरे इचिभन ! हत बी भाऊ लेल्या ? ) . असले हे अस्सल ब्राम्हण वीर प्रतापसिंह छत्रपतींची चळवळ आमूलाग्र उखडून टाकण्यासाठीं कमरा कसून सिद्ध झाले. परंतु ही सर्व सेना जातीची पडली ब्राम्हण. एकरकमी चित्पावन.

अस्सल राष्ट्रीय. तेव्हां आपल्या पक्षाला ‘ सार्वजनिकत्व’ आण-ण्यासाठीं बाळाजीपंतांना कांहीं आत्मद्रोही व घरभेद्या ब्राम्हणेतर पात्रांची फारच जरूर भासूं लागली. लवकरच परशुरामाच्या कृपेनें बाळाजीपंतांच्या या राष्ट्रीय चळवळींत एक विनमोल ब्राम्ह-णेतर प्यादें हस्तगत झालें. तें कोणतें म्हणाल, तर खुद्द प्रताप-सिंहाचे धाकटे भाऊ आप्पासाहेब भोंसले. खुद्द राजघराण्यांतलाच असला अस्सल मोहरा राष्ट्रीय चित्पावनी मंत्रांच्या जाळ्यांत सांपडतांच नातूच्या राष्ट्रीय कटाला सार्वजनिकपणाचें स्वरूप तेव्हांच आलें अणि ईस्ट इंडिया कंपनीच्या बगलेंत शिरून या राष्ट्रीय नातूकंपूनें इंग्रजांच्या हातून छत्रपतीच्या सिंहासनाचें परस्पर पावणे-तरा करण्याची आपली कारवाई सुरू केली. या कामीं त्यांनीं एकदोन शंकराचार्यसुद्धां बगलेंत मारले. नातूनीं विचार केला, कीं हा मरगट्टा छत्रपति, ब्राम्हणेतरांत धार्मिक आणि सामाजिक जागृति करून आम्हां भूदेवांचें वर्चस्व कधीपेक्षांहि पातळ करणार काय ? थांब लेका ! तुझ्या सिंहासनाच्या खालींच माझ्या चित्पावनी कारस्थानाचा बांब गोळा ठेवून, कंपनी सरकारच्या हातूनच त्याचा स्फोट करवितों. मग पहातों तुझ्या ब्राम्हणेतरांच्या उन्नतीच्या गप्पा ! बांधवहो, कोल्हापुरच्या श्रीशाहु छत्रपतींना ‘ स्वराज्यद्रोही ’ ठरविण्याची केसरीकारांची राष्ट्रीय चतुराई आणि प्रतापसिंहाला गुप्त कटाच्या फांसांत अडकवून जिवंत गाडण्याची नातुशाही या दोनही गोष्टींचा मसाला एकाच राष्ट्रीय गिरणीचा आहे, इतकें आपण लक्षांत ठेवलें म्हणजे झालें. नातुकंपूंत सामील झालेल्या या सर्व पंचरंगी राष्ट्रीयांनीं कंपनीसरकारच्या गव्हर्नरापासून तों

थेट सातारच्या रेसिडेंटापर्यंतच्या सर्व पात्रांच्या नाकांत आपल्या कारस्थानाची वेसण ‘ खूप शर्तीनें ’ घातली. अर्थात सर जेम्स कारनाकपासून तों थेट रेसिडेंट कर्नल ओव्हान्सपर्यंत सगळीं बाहुलीं लोकमान्य नातूंच्या सूत्राच्या हालचालीप्रमाणें ‘लेफ्ट राइट’ ‘लेफ्ट राईट’ करूं लागली. या पुढचा इतिहास अत्यंत भयंकर आणि मानवी अंतःकरणास जाळून टाकण्यासारखा आहे. परंतु तो प्रत्यक्ष घडवीत असतांना मात्र बाळाजीपंत नातू किंवा चिंतामणराव सांगलीकर यापैकीं एकाचेंहि अंतकरण चुकूनसुद्धां कधीं द्रवलें नाहीं. राष्ट्रीय अंत:करण म्हणतात तें हें असें असतें. अनुयायांची गोष्ट काय विचारावी ? जेथें खुद्द आप्पासाहेब भोसले, राज्यलोभानें सख्या भावाच्या गळ्यावर सुरी फिरविण्यास सिद्ध झाला, तेथें आपल्या सदसद्विवेक बुद्धीची मुंडी पिरगळतांना इतरांना कशाची भीती ? प्रतापसिंह महाराजांनीं भिक्षुकशाहीचें बंड मोडून ब्राम्हणेतरांना धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य देण्याची चळवळ हातीं घेतांच, बाळाजीपंत नातूंच्या उपरण्याखालीं जें राष्ट्रीय कुत्र्यांचें सार्वजनिक मंडळ जमा झालें, त्याला एवढीही कल्पना भासू नये काय, कीं आपल्या या उलट्या काळजाच्या कारस्थानामुळें श्रीशिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याचें सिंहासन आपण जाळून पोळून खाक करीत आहोंत ? महाराष्ट्राच्या मानेवर सुरी फिरवीत आहोंत? जाणूनबुजून क्षुल्लक स्वार्थासाठीं फिरंगी आपल्या घरांत घुसवीत आहोंत ? आजला त्याच हरामखोर नातूचे सांप्रदायिक जातभाई करवीरकर छत्रपतींना ‘स्वराज्यद्रोही छत्रपति’ म्हणून शिव्या देण्यास शरमत नाहींत. यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, बाळाजी-

पंत नातूचा स्वराज्यद्रोही संप्रदाय अजून महाराष्ट्रांत जिवंत आहे. आम्हांला जर स्वराज्य मिळवावयाचेंच असेल, आमचें उद्याचें स्वराज्य चिरंजीव व्हावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर प्रतापसिंहाच्या वेळीं भिक्षुकशाहीनें या साताऱ्यांत रायगडच्या स्वराज्याचा जसा मुडदा पाडला, तसाच उद्याच स्वराज्य मिळविण्यापूर्वी महाराष्ट्रांत शिल्लक उरलेल्या स्वराज्यद्रोही नातु संप्रदायाचा आपणांस प्रथम नीमोड केला पाहिजे. नव्हे, असें केल्याशिवाय तुम्हांला स्वराज्यच मिळणें शक्य नाहीं. बाळाजीपंत नातूचें चरित्र भ्रूणहत्या, स्त्रीहत्या, गोहत्या, स्वराज्यहत्या आणि सत्यहत्या असल्या कल्पनातीत महापातकांनीं नुसतें बरबटलेलें आहे. अर्थात् जोंपर्यंत हा नातु, किबे, केळकर ॲन्ड को० चा संप्रदाय महाराष्ट्रांतून हद्दपार होणार नाहीं तोंपर्यंत आपल्याला खरेंखुरें स्वराज्य लाभणार नाहीं. या संप्रदायाच्या स्वराज्यद्रोही लीला जर नीट विचारांत घेतल्या नाहींत, तर तुमच्या पदरांत पडणारें स्वराज्य म्हणजे ब्राम्हणभोजनांतल्या खरकट्या पत्रावळी हें खूप ध्यानांत ठेवा.

छत्रपति प्रतापसिंहानें ब्राम्हणेतरांची सुरू केलेली चळवळ हाणून पाडण्यासाठीं, खुद्द त्यालाच पदभ्रष्ट करून मुळांतलाच कांटा उपटण्याची बाळाजीपंत नातूच्या राष्ट्रीय कंपूची जी तयारी झाली, तिकडे आपण आतां वळू. हरप्रयत्नानें घरभेद करून फोडलेल्या अप्पासाहेब भोसल्याला ता० २४ मार्च १८३९ रोजीं नातूनें रेसिडेंट ओवन्सच्या चरणांवर नेऊन घातलें व त्याच्या झेंड्याखालीं सर्व स्वराज्यद्रोही गुप्तकटवाल्यांची मर्कटसेना भराभर जमा केली. कंपनी सरकारच्या गव्हर्नरापर्यंत सर्वांना प्रतापसिंहाविरुद्ध चिथावून

देऊन, हा राजा इंग्रजांचें राज्य उलथून पाडण्याचा गुप्त कट करीत आहे, आम्ही सर्व पुरावा आपल्याला देतों, मांबाप कुंफणी सरकारची आम्हांला पूर्ण मदत असावी, असा मंत्र फुंकून रेसिडेंट ओवन्सला नातूकंपूनें आपलें तोंड वनविलें. राजकीय वाव ओवन्सच्या मार्फत अशी पेटवून दिली, तों इकडे (अ)धर्ममार्तंड चिंतामणराव सांगलीकर यांनीं वेदोक्त पुराणोक्त तंटा उपस्थित करून छत्रपतीच्या विरुद्ध, कंपनी सरकाराकडे धार्मिक जुलमांबद्दल फिर्यादीच्या अर्जांचीं भेंडोळीं रवाना करण्यासाठीं आपली ब्राम्हण-सेना जय्यत उभी केली. आज ज्याप्रमाणें ब्राम्हणेतरांविरुद्ध व विशेषतः सत्यशोधकांविरुद्ध अत्याचारांच्या खोटयानाटया फिर्यादींची दंगल उडालेली आहे, त्याचप्रमाणें चिंतामणरावांच्या ब्राम्हणसैन्यानें आपला शंखध्वनीचा संप्रदाय मोठ्या नेटानें चालू केला. हे राष्ट्रीय ब्राम्हण नुसत्या कागदी अर्जांच्या कारस्थाना-वरच अवलंबून बसले नाहींत. निरनिराळ्या वेळीं कंपनी सरकारच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या छावण्यांपुढें हजारों ब्राम्हणांनीं जमून जाऊन प्रतापसिंहाच्या विरुद्ध धार्मिक व सामाजिक अत्याचारांची अकांडतांडवपूर्वक कोल्हेकुई करण्याची सुरवात केली. चिंतामण-रावानें तर नातूचे व्याही कुप्रसिद्ध निळकंठ शास्त्री थत्ते यांच्या अध्वर्युत्वाखालीं ब्राम्हणेतरांना, विशेषतः मराठ्यांना व कायस्थ प्रभूंना ‘ शूद्राधम चांडाळ ’ ठरविणारे ( अ)धार्मिक ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याची एक मोठी गिरणीच सांगलीला काढली. छत्रपती-कडून होणाऱ्या ब्राम्हणांवरील अत्याचारांच्या बनावट हकीकती जिकडे तिकडे बेसुमार पसरविण्याच्या कामगिरीनें त्या वेळच्या

ब्राम्हण स्वयंसेवकांनीं अद्भुत ‘ राष्ट्रीय ’ कामगिरी बजाविली. विशेष चीड येण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्या शिवाजी महाराजांनीं या कृतघ्न ब्राम्हणांच्या बापजाद्यांची जानवेंशेंडी रक्षण केली, त्याच शिवाजीचा अस्सल वंशज प्रतापसिंह छत्रपति हा ‘ हिंदूच नव्हे, हा हिंदु धर्माचा वैरी आहे. ’ अशा अर्थाचे मोटमोठे जाहिरनामे चिंतामणराव सांगलीकरानें शहरोशहरीं व खेडोखेडीं सर्व हिंदुस्थान-भर फडकविण्यांत बिलकूल कमतरता केली नाहीं ! इतकें झालें तरी नातूकंपूच्या मार्गात एक मोटा कांटा अजून शिल्लकच होता. आणि तो मात्र कसल्याहि लांचलुचपतीला बळीं न पडण्याइतका भक्कम व सडेतोड होता. तो कोण म्हणाल, तर ज्याला आद्य छत्रपति शिवाजी महाराज ‘ बाळाजी माझा प्राण आहे ’ असें म्हणत असत, त्या बाळप्रभु चिटणीसाचा अस्सल वंशज बळवंतराव मल्हार चिटणीस हा होय. बळवंतराव जर आपल्या चिटणिशीवर चुकून माकून कायम राहता, तर त्याच्या चिटणिशी लेखणीच्या घोड्यांनीं नातूकंपूच्या घरादारावर गाढवांचे नांगर फिरविले असते ! परंतु चित्पावनी काव्याची पोंच जबरदस्त ! बळवंतरावाचा पराक्रम नातू जाणून होता. चिटणिस कायम असेपर्यंत छत्रपतीचा रोमही वांकडा होणार नाहीं, ही त्याची पुरी खात्री होती. चिटणिशी लेखणीपुढें परशुरामाच्या वरप्रसादाची पुण्याई वांझोटी ठरणार हा अनुभव त्याच्या डोळ्यापुढें होता. म्हणून हा चिटणिशी कांटा उपटण्यासाठीं नातूनें कर्नल ओवन्सकडून बळवंतराव चिटणिसाला एकाकीं अचानक पकडून बिनचौकशीनें पुण्याच्या तुरुंगांत फेकून दिलें. बिनचौकशीनें अटक करण्याच्या ब्रिटिश नोकरशाहीच्या पद्धतीविरुद्ध ‘ अन्याय’

'अन्याय' म्हणून कोलाहल करणाऱ्या राष्ट्रीयांनीं आपल्या संप्रदायाच्या पूर्वजांचें हें हलकट कृत्य विचारांत घेण्यासारखें आहे

चिटणीसाचा काटा अशा रीतीनें उपटल्यावर नातूचा मार्ग बिनधोक झाला. छत्रपतीच्या राजवाड्यांतील अनेक प्रामाणिक नोकरांना पकडून, लांच देऊन, मारहाण करून, नानाप्रकारचे खोटे दस्तऐवजी पुरावे तयार केले, व रेसिडेंटापुढें खोट्या जबान्या देवविल्या. कांहीं नातूच्या कारस्थानास बळी पडले व कांहीं स्वामिनिष्ठेला स्मरून आनंदानें तुरुंगांत खितपत पडले. बाळकोबा कळकर या कुबुद्धिमान गृहस्थानें बनावट सह्या शिक्के बनविण्याचें राष्ट्रीय कार्य हातीं घेतलें. प्रतापसिंह छत्रपति हा ब्राम्हणांचा भयंकर छळ करतो, या नाटकाची उठावणी चिंतामणरावानें आपलेकडे घेतली होती आणि या कामीं त्यांनीं शंकराचार्यांच्या नरडीवर सुद्धां गुडघा देऊन खोटीं आज्ञापत्रे बळजबरीनें लिहून घेण्यास कमी केलें नाहीं. राजकारणाच्या बाबतींत छत्रपतीच्या गळ्यांत कंपनी सरकारविरुद्ध गुप्तकटाची राजद्रोहाची घोरपड लटकविण्याचें पुण्य कार्य मात्र खुद्द महात्मा नातूनीं आपल्या हातीं ठेवलें होतें. या कामीं बनावट राजद्रोही पत्रें खलितें अर्ज्या या निर्माण करण्याच्या कामीं हैबतराव व आत्माराम लक्ष्मण उर्फ अप्पा शिंदकर या दोघां ब्राम्हणेतर पात्रांना हातीं धरून बाळाजी काशी किबे आपल्या कल्पकतेची कसोशी करीत होता. अखेर बातु कंपूचें सर्व कारस्थान शिजून तयार झालें. गोव्याच्या पोर्तुगीज सरकारकडे प्रतापसिंहानें गुप्त संधान बांधून त्यांच्या मदतीनें इंग्रजांना हुसकून देण्याच्या

बनावट कटाबद्दल कंपनी सरकारच्या गव्हर्नराची ' वेदोक्त ' खात्री पटली. ब्राम्हणांच्या छळाविषयीं कंपनीसरकारनें जरी कानावर हात टेविले,—कारण धार्मिक, सामाजिक बाबतींत तोंड न बुचकळण्याचा त्यांचा निश्चय जगजाहीरच—तरी पण छत्रपतीविरुद्ध स्वराज्यद्रोहाचा आरोप बळकट करण्याच्या कामीं चिंतामणरावांचा राष्ट्रीय शंखध्वनी अगदींच कांहीं फुकट गेला नाहीं. प्रतापसिंहास या सर्व गोष्टी कळत नव्हत्या, अशांतली गोष्ट नव्हती. परंतु त्या वेळीं घरभेदपणा अतोनात माजल्यामुळें, आणि नातूच्या राष्ट्रीय पक्षाकडून फंदफितुरीचा भयंकर सुळसुळाट झाल्यामुळें महाराजांच्या आत्मविश्वासानें कच खाल्यास त्यांत नवल तें काय? तथापि, काय वाटेल तें होवो आपण जर कोणाचें वाईट करीत नाहीं, सत्य मार्गानें जात आहोंत आणि कंपनी सरकारशीं कोणत्याहि प्रकारें दुजाभावानें वागत नाहीं, तर माझें कोण काय वांकडें करणार? अशा प्रामाणिक समजुतीवर महाराजांनी नातुकंपूच्या बावटळीस तोंड देण्याचा निश्चय केला. चिटणीसाची अचानक उचलबांगडी झाल्यामुळें त्यांचा धीर बराच खचला. सरते शेवटीं देवावर हवाला टेवून सत्यासाठीं येतील तीं संकटें निमूटपणें सहन करण्याचें त्यांनीं ठरविलें.

ता. २२ आगस्ट १८३९ रोजीं मुंबईचे गव्हरनर सर जेम्स कारनॅक आपल्या लवाजम्यानिशीं नातूकंपूनें शिजवून ठेवलेली गुप्त कटाची हांडी फोडण्यासाठीं सातान्यास येऊन दाखल झाले. महा-

राजांना निमंत्रण जातांच दुपारीं तीन वाजतां ते त्यांच्या भेटीस गेले. त्यावेळीं त्यांचें झालेलें संभाषण सारांशानें असें होतः—

**सर जेम्सः**—तुम्ही आमच्या विरुद्ध गुप्त कट चालविलेला आहे, आणि त्याचा सर्व पुरावा माझ्यापाशीं आहे.

**महाराजः**—काय? आपल्याविरुद्ध मीं गुप्त कट केला आहे? अगदीं बनावट गोष्ट! आपण या बाबतींत वाटेल तर माझी उघड चौकशी खुशाल करावी.

**सर जेम्सः**—त्यांत काय चौकशी करायची. खऱ्या गोष्टी मला सर्व माहीत आहेत. याउपर चौकशीची यातायात करण्याची आम्हाला जरूर नाहीं. आतां आपल्याला एकच मार्ग मोकळा आहे, आणि तो हाच कीं, मी सांगतों या जबानीपत्रकावर आपण मुकाट्यानें सही करावी. घासाघीस करायला मला वेळ नाहीं.

**महाराजः**—आपल्याला वेळ नसेल तर मी सर्व कागदपत्र ओव्हन्स साहेबाला दाखवून त्यांची खात्री पटवून देईन. माझ्यावरील किटाळाचा समतोल बुद्धीनें उघड न्याय व्हावा हीच माझी इच्छा आहे. कंपनी सरकारशीं दुजाभावानें मी कधींहि वागलो नाहीं. इंग्रज सरकारच्या मैत्रीसाठीं मी विहिरींत उडी घ्यायलाहि कमी करणार नाहीं. परंतु माझ्या कल्पनेंतहि कधीं न आलेल्या ज्या घाणेरड्या गोष्टी केल्याचा आरोप माझ्यावर आलेला आहे, त्याबद्दल माझा प्राण गेला तरी मी कबुली जबाब देणार नाहीं. सत्यासाठीं प्राण गेला तरी बेहत्तर!

**सर जेम्स**:—महाराज, मी काय म्हणतो तें मुकाट्यानें करा. त्यांत तुमचा फायदा आहे. नाहींतर तुमचें राज्य राहाणार नाहीं. हें लक्षांत ठेवा.

**महाराज**:—मी राज्याची कधींच अपेक्षा केलेली नाहीं. इंग्रज सरकारच्या दोस्तीचा मात्र मी चाहता आहे. परंतु विनचौकशीनें घाणेरडे बनावट आरोप कबूल करून या राज्यावर राहाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. तुमची इच्छा असेल तर माझे राज्याधिकार आतांच घ्या, मी खुशाल भीक मागून आपलें पोट भरीन. माझ्या चिटणिसाप्रमाणें मला उचलून तुरुंगात टाकावयाचें असेल तर खुशाल टाका. तुमच्या संत्रीच्या देखरेखीखालीं मी भिक्षा मागून राहीन. आतां मी आपल्या बंगल्यावरच आहें. मी येथून घरीं परतच जात नाहीं, म्हणजे झालें! काय तुम्हांला वाटेल तें करा.

**सर जेम्स**:—असें करूं नका. मी सांगतों याप्रमाणें या कागदावर मुकाट्यानें सही करून मोकळे व्हा. नाहींतर मला निराळी तजवीज करावी लागेल.

**महाराज**:—तुम्हांला काय वाटेल ती तजवीज करा. ज्या गोष्टी मी केल्या नाहींत, त्या केल्या म्हणून आपल्याला लेखी जबानी देऊं काय? ही गोष्ट प्राणांतींही होणार नाहीं.

प्रतापसिंह महाराजांच्या या सत्यप्रिय आणि बाणेदार वर्तनाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं त्या वेळीं पार्लमेंटपुढें व्याख्यान देतांना मेजर जनरल रॉबर्टसननीं जे उद्गार काढले तेच मी आपणांस सांगतों. ते

म्हणाले– The conduct of the Raja of Satara would do honour to the best days of ancient Rome, and is, in my opinion, in itself a sufficient refutation of all that has been urged against him.

( **भावार्थ**—प्राचीन रोमन साम्राज्याच्या नैतिक सुवर्णयुगाला साजे शोभेसेंच वर्तन महाराजांनीं केलें व त्यांच्या सत्याग्रही तडफींतच त्यांच्याविरूद्ध रचलेल्या बनावट कितांळाचा फोलकटपणा सिद्ध होत आहे.) महाराजांविषयीं भिक्षुकशाहीच्या ज्वलज्जहाल द्वेषाची परिस्फुटता करतांना रॉबर्टसननीं काढलेले उद्गार चालू घटकेलासुद्धां विचार करण्यासारखे आहेत. राष्ट्रीय गुंडांच्या स्वराज्यपुराणांच्या चालू धामधुमींत ते उद्गार तुम्ही नीट मनन करा :—

The Rajah had many reckless and influential enemies, and particularly that he had incurred the enmity of the Brahmins, and as it was on religious grounds that their enmity was founded, their hostility partook of all that deadly hatred which is so often mixed up in polemical disputes. I may add also, that there are no persons so unscrupulous as Brahmins when they have a Brahmanical object to carry. Every thing which

is likely to promote their views, however unprincipled, is then resorted to. for they think that, in such a cause the end hollows the means......I believe among his many enemies, His Highness considers the Brahmin tribe as the most numerous, virulent and influential. I may state that, upon political grounds, there exists much jealousy and ill will on the part of that race to His Highness, merely because his restoration to the possession of that small share of power and importance which he now enjoys, results from the political overthrow of the Brahmin power.

( **भावार्थ**—राजाचें आणि ब्राम्हण लोकांचें भयंकर हाडवैर होतें. विशेषत: त्याचें मूळ धर्मविषयक तंट्यांत असल्यामुळें तर भिक्षुकशाही त्याच्यावर जळजळीत आग पाखडीत असे. मी असें स्पष्ट म्हणतों कीं, या भटांना एकादा भटी कावा साधायचा असला म्हणजे ते काय अत्याचार व भानगडी करतील याचा नेमच नाहीं. त्यांचे बेत साधण्यासाठीं करूं नये त्या गोष्टीसुद्धां करायला ते मागेंपुढें पहात नाहींत; कारण त्यांना पक्कें माहीत असतें कीं हेतू साध्य झाला. कीं साधनांच्या बेरत्वाईटपणाची

चौकशीं होते कसली ? ......राजाच्या दुष्मानांत° ब्राम्हणांचा नंबर अगदीं पहिला. शिवाय ते बरेच असून जितके ते राक्षसी व दुष्ट आहेत, तितकेच वजनदारही आहेत. राजकारणाच्या बाबतीत सुद्धां ब्राम्हणांचा द्वेष कमी भयंकर नाहीं. त्या दृष्टीनें तर ब्राम्हण लोकांच्या डोळ्यांत तो रात्रंदिवस सलत असतो. याचें कारण काय, तर पेशव्यांची ब्राम्हणी राजसत्ता नष्ट झाली व या राजाची थोडीबहुत राज्यसत्ता जिवंत राहिली, हेंच. ) सन १८४० सालचे हे उद्गार चालू घटकेलासुद्धां पुण्याची राष्ट्रीय भिक्षुकशाही व कोल्हापूरचे श्री शाहू छत्रपति यांच्या झगड्यांत किती सापेक्ष रीतीनें सिद्ध होत आहेत, याचा आपणच नीट विचार करा. या हिंदुस्थानांत मराठ्याचें किंवा एखाद्या ब्राम्हणेतराचें एकहि राज्य कोठें शिल्लक राहूं नये, जिकडे तिकडे सारी भटभिक्षुकशाही माजावी, ब्राम्हणेतरांवर ब्राम्हणांची सनातन कुरघोडी असावी, यासाठीं या राष्ट्रीय गुंडांची केवढी धडपड चाललेली असते, हें जर आपण जरा लक्षपूर्वक विचारांत घ्याल, तर राष्ट्रीयांच्या स्वराज्याच्या गप्पा म्हणजे ब्राम्हणभोजनाच्या खरकट्या पत्रावळी असें जें मी म्हणतों, त्याचा तुम्हांला तेव्हांच उलगडा होईल.

तागडीच्या जोरावर सबंध हिंदुस्थानभर तंगड्या पसरणाऱ्या कंपनी सरकारलासुद्धां छत्रपतीसारखा पाणीदार राजा व त्याचें संस्थान शिल्लक ठेवणें जिवावरच आलें होतें. तशांत स्वदेशांतलेच ब्राम्हण लोक जर एकमुखानें स्वदेशी राजाला जिवंत गाडण्याची चळवळ करीत आहेत, तर त्या चळवळीचा फायदा घेऊन परस्प

पावणे तेरा या न्यायानें नातूकंपूनें शिजविलेल्या बनावट राजद्रोहाच्या हांडीनें छत्रपतीचा कपाळमोक्ष होत असल्यास कंपनी सरकारला तें हवेंच होतें. म्हणजे आपला स्वार्थ साधण्यासाठीं नातू कंपूनें कंपनी सरकारला व कंपनी सरकारनें नातुकंपूला परस्पर मिठ्या मारण्यांत व्यभिचारी राजकारणाचें बेमालूम डावपेंच दोघेहि खेळले, हाच इतिहासाचा पुरावा आहे. कंपनीसरकार आपलें कांहीं ऐकत नाहीं, न्यायाचा प्रश्नसुद्धां तें विचारांत घेत नाहीं, उलट हरामखोर ब्राम्हणांच्या पूर्ण पचनीं पडून पदभ्रष्ट करण्याच्या धमक्या देत आहेत, अशा परिस्थितींत केवळ सत्यावर भरंवसा ठेऊन, परमेश्वरी इच्छेच्या हातांत आपल्या दैवाचा झोला सोडून, प्रतापसिंहानें निःशस्त्र सत्याग्रह करण्याचें ठरविलें. कंपनी सरकारच्या सैन्यबळापुढें छत्रपतीचें सैन्यबळ जरी कांहींच नव्हतें, तरी छत्रपतीच्या तख्तासाठीं रक्ताचा थेंब न् थेंब खर्ची घालणारे मावळे-मराठे व ब्राम्हणेतर लोक वेळ पडल्यास मधमाशीच्या झुंडीप्रमाणें भराभर बाहेर पडण्यास कमी करणार नाहींत, याची जाणीव कंपनी सरकारला होती. नातूनें सुद्धां छत्रपतीचें उच्चाटन करण्यासाठीं इंग्रजी सैन्याची जय्यत तयारी करण्याचा मंत्र रेसिडेंट ओव्हन्सच्या कानांत फुंकला होता. आणि त्याप्रमाणें तोफखाना, घोडेस्वार यांसह ग्रेनेडिअरची पंचविसावी पलटण ३१ आगष्ट १८३९ रोजीं पुण्याहून निघून ४ सप्टेंबर रोजीं दुपारीं दोन वाजतां सातार्‍यास येऊन थडकली. ग्रामण्याच्या तंत्रमंत्रानें, राजकारणाच्या कागदी बुजगावण्यानें, किंवा मुंबईच्या गव्हर्नरच्या तोंडीं धमकावणीस

मराठी ग्रंथ संग्रहालय नं.

प्रतापसिंहाचा प्रताप जेव्हां कसभरसुद्धां डळमळला नाहीं, तेव्हां इंग्रजी सैन्याच्या हिंमतीवर छत्रपतीला अचानक पकडून हद्दपार करण्याचा वज्रजबरीचा बेत नातूकंपूनें ठरविला. या बेताची कुणकुण महाराजांना लागतांच, त्यांनीं या जय्यत तयारीला तोंडघशीं पाडण्याचा निश्चय केला. त्यांनीं विचार केला कीं, जर मी सर्वस्वी निष्कलंक आहे, तर कंपनी सरकारच्या सशस्त्र प्रतिकाराची मी कशाला पर्वा ठेवूं ? ज्यांनीं आपल्या न्यायबुद्धीचाच खून पाडलेला आहे; सांगलीकर, नातू, किब्यासारख्या स्वराज्यद्रोही हरामखोरांना जहागिरींचा मलीदा चारून माझ्या विरुद्ध उठविलेले आहेत, त्यांनीं माझ्यावर शस्त्र चालवून माझा घात केला, तर त्यांत काय आश्चर्य ? तावडतोब महाराजांनीं सेनापती बाळासाहेब राजे भोसले यांच्याकडून स्वतःच्या सैन्याची कवाईत करविली, आणि आपण स्वतः सैनिकांच्या हातांतलीं सर्व शस्त्रें काढून घेतलीं. बाळासाहेब सेनापतीच्या कमरेची समशेर काढून घेऊन त्याला निःशस्त्र केले. राजवाड्यांतल्या पटांगणांतल्या सर्व तोफांतील दारू का[illegible] त्या पाण्यानें धुऊन रिकाम्या केल्या आणि सर्व सातारा [illegible]र निःशस्त्र सत्याग्रहाचा जाहिरनामा पुकारला. प्रजाजनांना आपल्या गळ्याची शपथ घालून महाराजांनीं असें विनविलें कीं आज रोजीं कंपनीसरकारच्या गोऱ्या सोजिरांनीं जरी तुमचीं घरेंदारें लुटलीं, तरी कोणीही आपला हात वर करतां कामा नये. बांधवहो, निःशस्त्र सत्याग्रहाची मोहीम महात्मा गांधींच्याही पूर्वी ८३ वर्षे आपल्या प्रतापसिंह छत्रपतींनीं एक वेळ या खुद्द साताऱ्यांत आणि तीही अशा काळांत कीं हे म्हणतांच कंपनी या सार्थीदारांची न सैन्याची

एकजात कत्तल करण्याची धमक मावळ्यांच्या मनगटांत रसरसत होती, अशा स्थितींत शक्य करून दाखविली, हें ऐकून ज्या अंतःकरणांत कौतुकाचा व अभिमानाचा दर्या खवळणार नाहीं, तें अंतःकरण मर्द मावळ्यांचें नसून कारस्थानी भटाचेंच असलें पाहिजे. ता. ४ सप्टेंबर १८३९ ची संध्याकाळ झाली. आज बाळाजीपंत नातूंच्या कारस्थानामुळें, साताऱ्च्या राजधानींत शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा भर मध्यरात्रीं मुर्दा पडणार, या कल्पनेनें अस्तास जाणारा सूर्यनारायण रक्ताचे अश्रु टपटपा गाळीत रक्तबंबाळ होऊन सह्याद्रीच्या शिखराआड नष्ट झाला. स्वराज्यद्रोही आप्पासाहेब भोसला आणि महाराष्ट्राच्या मानेवर सुरी फिरविणारा कसाब बाळाजीपंत नातू या दोघांच्या आधिपत्याखालीं गोऱ्या सोजिरांच्या पलटणी सातारा शहराचीं सर्व नाकीं अडवून उभ्या राहिल्या. रेसिडेंट ओव्हन्स साहेबांची अश्वारूढ स्वारी इकडून तिकडे भराऱ्या मारूं लागली. पण साताऱ्यांत त्या वेळीं काय होतें ? जिकडे तिकडे सत्याग्रह ! शुद्ध स्मशानशांतता ! प्रतिकाराची उलट सलामी छत्रपति देतील, ही नातूची कल्पना फोल ठरली. प्रजाजनांनीं आपापलीं भोजनें उरकून यथास्थितपणें निद्रेची तयारी केली. खुद्द छत्रपति भोजनोत्तर आपल्या महालांत खुशाल झोंपीं गेले.

निष्कलंक मनोवृत्तीला निद्रादेवी कधींहि बिचकत नाहीं, याचें प्रत्यंतर येथें दिसलें. शनिवार वाड्यावर झेंडे फडकविणारे राष्ट्रीय पक्षाचे ब्राम्हण वीर लोकमान्य नातू मध्यरात्रीच्या सुमारास ओव्हन्सच्या कानाला लागले. राजवाड्याला सोजिरांचा गराडा

पडला. घरभेद्या आप्पासाहेब पुढें, पाठीमागें रेसिडेंट ओव्हन्स आणि चार पांच गोरे सोजीर, अशी ही चांडाळ चौकडी, आज आपण ज्या राजवाड्यासमोर जमलेले आहोंत त्या राजवाड्याच्या छातींतला प्राण हरण करण्याकरिता यमदूता प्रमाणें आंत घुसली. त्यांनीं देवघराचें पावित्र्य पाहिलें नाहीं. त्यांनीं जनान्यांतील राजस्त्रियांच्या अब्रूकडे पाहिलें नाहीं. ते खाडखाड बूट आपटीत छत्रपतीच्या शयनमंदिराकडे गेले. आप्पासाहेबांनीं ' हे आमचे दादा ' असें बोट करून दाखवितांच त्या वेळचा महाराष्ट्राचा ओडवायर कर्नल ओव्हन्स झटदिशीं पलंगाजवळ गेला आणि गाढ निद्रेंत घोरत असलेल्या छत्रपतीला त्यानें मनगटाला धरून खसकन पलंगावरून खालीं ओढलें आणि ' तुम हमारे साथ चलो ' असें म्हणून तो त्यांना खेंचू लागला. सत्याग्रही छत्रपति कांहींहि प्रतिकार न करितां मुकाट्यानें चालूं लागले. त्यावेळीं ते फक्त एक मांडचोळणा नेसलेले होते. त्या-शिवाय आंगावर दुसरें कांहींहि वस्त्र नव्हतें. छत्रपतीची अशा उघड्या बोडक्या स्थितींत उचलबांगडी झालेली पाहून जनान खान्यांत हकल्लोळ उडाला. चाकर माणसें भयाभीत होऊन हातांत दिवट्या घेऊन सैरावैरा धांवपळ करूं लागलीं. एकच आकांत उडाला. सर्व लोक निःशस्त्र, त्यांतच खुद्द छत्रपतींची सत्याग्रहाची शपथ, यामुळें कोणाचाच कांहीं उपाय चालेना. महाराजांच्या दंडाला धरून ओव्हन्सनें त्यांना राजवाड्याबाहेर आणलें, आणि तयार असलेल्या पालखींत त्यांना कोंबलें. जवळच उभे असलेल्या बाळाजीपंत नातूच्या डोळ्याचें पारणें फिटलें. परशुरामाचा नर पूर्ण

झाला. शिवाजी महाराजांच्या हिन्दवी स्वराज्याचें प्रेत भिक्षुकशाहीच्या तिरडीवर चढलें पाहून रेसिडेंट ओव्हन्सला स्वर्गप्राप्तीचा आनंद झाला. आप्पासाहेव भोंसल्याचा घरभेदेपणा कचकाऊन फळफळला. एका मिनिटाच्या आंत सोजिरांच्या पहाऱ्याखालीं सत्याग्रही छत्रपतींची पालखी चालू झाली. प्रजाजन भराभर जमा होऊं लागले. मध्य रात्रीचा वेळ, तरीसुद्धां सातारचा राजरस्ता नरनारींनी गजबजून गेला. आपला छत्रपति असा उघडा वोडका पकडून नेतांना पाहून त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे धवधवे वाहूं लागले. पण करतात काय? सत्याग्रहाची शपथ अक्षरशः पाळणें जरूर होतें. इतक्यांत कोणी एकानें धांवत धांवत येऊन, आपल्या घरांतील एक शाल आणून महाराजांच्या अंगावर घातली. सातारच्या ब्राम्हणेतर प्रजेनें छत्रपतींना अखेरचा मुजरा ठोकला आणि क्रिस्टॉल नांवाच्या सोजिराच्या आधिपत्याखालीं पालखी साताऱ्याच्या हद्दपार झाली. इतक्यांत आप्पासाहेव भोंसल्याच्या चिथावणीवरून सेनापति बाळासाहेव भोंसल्याना कांहीं सोजिरांनीं पकडून धांवत धांवत छत्रपतींच्या पालखी जवळ नेलें व तें सेनापतींचें पार्सल धाडकन त्याच पालखींत फेंकून दिलें. बाळासाहेबानें ताडकन पालखीच्या बाहेर उडी मारली आणि त्वेषानें म्हणाला "खबरदार. ज्या छत्रपतींच्या पायाला स्पर्श करण्याची आजपर्यंत कोणाचीही ताकद झाली नाहीं, त्यांच्या बरोबरीला बसून छत्रपतींच्या तक्ताची मी अवहलना करूं काय? मी जरी निःशस्त्र असलों तरी अशाही स्थितींत मी पांच पन्नासांना लोळवायला कमी करणार नाहीं हें लक्षांत ठेवा." इंग्रेजांच्या लोकविश्रुत पॉलिसीप्रमाणें छत्रपतींच्या

संभाजीचा शेवटला मुक्काम कोणालाही कळणें शक्य नव्हतें. पहिल्या दिवशीं क्रिस्टॉल कंपूनें आठ मैलांची मजल मारून निवगांवांत मुक्काम केला. त्या ठिकाणीं गाई म्हशी बांधण्याच्या गोठ्यांत जेथें शेण आणि मुत्र सर्वत्र पसरलेलें आहे, उंदीर, झुरळें, चिलटें, पिसवा वगैरेंचा सुळसुळाट आहे, अशा जागेंत छत्रपतींना आणून बसविलें. बांधवहो! या वेळची छत्रपतींच्या मनःस्थितीची आपणच कल्पना करावी हें बरें. दुसऱ्या दिवशीं मागोमाग महाराजांची राणी, कन्या सौभाग्यवती गोजराबाई वगैरे कबिले येऊन दाखल झाले. गाई म्हशीच्या गोठ्यांत हिंदूंचा बादशहा हरामखोर ब्राम्हणांच्या कारस्थानामुळें अस्ताव्यस्त स्थितींत पडलेला पाहून, राजवैभवांत वाढलेल्या त्या राजस्त्रियांच्या अंतःकरणाची स्थिती काय झाली असेल, याची कल्पना करवत नाहीं! पण कल्पना कशाला? इतिहास काहीं मेला नाहीं. राजहत्येबरोबर बाळाजीपंत नातूला भ्रूणहत्येचें पातक कमवा यचें होतें. त्या पातकाचा फोटोग्राफ इतिहासांत उमटलेला आहे. नातूच्या वंशजांनीं आणि त्याच्या स्वराज्यद्रोही राष्ट्रीय सांप्रदायिकांनीं आपल्या बेचाळीस बापजाद्यांची पुण्याई जरी खर्ची घातली तरी, तो ऐतिहासिक पुरावा नष्ट होणें शक्य नाहीं. आपला प्रियकर बाप, साताऱ्याचा छत्रपति, हिंदी स्वराज्याचा हिंदु बादशाहा, गाई म्हशीच्या गोठ्यांत वस्त्राशिवाय बसलेला पाहून गोजराबाईनें एक भयंकर किंकाळी फोडली व ती बेशुद्ध पडली, बांधवहो! यापुढील प्रकार अत्यंत भयंकर. गोजराबाई आठ महिन्यांची गरोदर होती. बेशुद्ध पडतांच तिचा गर्भपात झाला. चहू-

कड जंगल, कैद्याच्या कैदेंत माणसें सांपडलेली, अशा स्थितींत त्या बिचारीला कसलें औषध आणि कसला उपचार! देवाची खैर, म्हणून विचारीचा जीव तरी वांचला. येथून मुक्काम हालतांच तिकडे बाळाजीपंत नातूचें विचारयंत्र सुरू झालें. या महात्म्यानें असा विचार केला कीं छत्रपतीबरोबर बाळासाहेब सेनापती असणें ही मोठी घोडचूक. चिटणीसाला जसा अचानक उचकून फेकून दिला, तशी बाळासाहेब सेनापतीची वासलत लावली पाहिजे. नाहीं तर हा छत्रपति त्याच्या साहाय्यानें एकादें नवीन स्वराज्य देखील निर्माण करावयाचा! म्हणून बाळाजीपंतानें आपला कुळस्वामी ओव्हन्साहेब याच्याकडून सेनापतीला पकडण्याचें वारंट सोडलें. वारंटांतील मजकूर असा होता कीं सातार्‍यांत तुम्हांला लाखों रुपयांचें देणें आहे तें फेडल्याशिवाय तुम्हाला सातार्‍यांतून जातां येत नाहीं. हा आरोप बनावट होता, हें सांगणें नकोच. तथापि दुसर्‍या मुक्कामावर वारंटाची टोळी बाहेर येतांच सेनापतीनें आपल्या व सेवकांच्या अंगावरील उरलेले कांहीं डागडागिने देऊन त्या शिपायांची कांहीं तरी समजूत करून ( कारण हे शिपाई पूर्वी सेनापतीच्याच हुकमतीखालीं होते व त्यांना खर्‍या गोष्टी माहीत होत्या.) त्यांना सातार्‍यास परत रवाना केलें. मुक्काम दर मुक्काम घोडदौडीची पायीं चाल करून वाटेंत बाळासाहेब सेनापतीला आमांशाचा रोग जडला व रक्त पडूं लागलें म्हणून औषधोपचारासाठीं वाटेंत मुक्काम करण्याबद्दल छत्रपतींनीं क्रिस्टॉल साहेबाची नानाप्रकारें विनवणी केली. ओव्हन्स रेसिडेंट हा जसा त्या वेळचा ओडवायर होता, तसाच त्याचा साथीदार हा नराधम क्रिस्टाल त्या वेळचा डायर म्हटला तरी चालेल. त्यानें

विनतीचा अवमान करून मुक्कामाची दौड चालूच ठेवली. मात्र बाळासाहेबाला त्यानें एका स्वतंत्र मेण्यांत चालविलें होतें. परंतु औषधोपचाराची तर गोष्टच राहूंद्या, पण बिचाऱ्याच्या नुसत्या अन्न पाण्याचीही कोणी व्यवस्था पाहिली नाहीं. अखेर एका मुक्कामावर क्रिस्टॉल साहेबांची सहज लहर लागली म्हणून मेणा उघडून पहातात, तों बाळासाहेबांचें प्रेत कुजून त्याला घाण सुटलेली! बाळा-साहेबांचा मृत्यु होतांच त्यांच्या पतिपरायण पत्नीनें एकदोन दिवसांतच प्राणत्याग केला. अशा रीतीनें बाळाजीपंत नातूं आपल्या ब्राम्हणी कारस्थानाच्या तिरडीवर आप्पासाहेब भोसल्याच्या हातून बांधलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मुड्याची प्रेतयात्रा बनारसला पोंचेपर्यंत वाटेंत अनेक हत्या घडल्या. बनारसला महाराज छत्रपति ह्यांना तुरुंगांत ठेवलें आणि अशा रीतीनें सध्यांच्या राष्ट्रीय पक्षांचे इतिहासप्रसिद्ध पूर्वज लोकमान्य बाळाजीपंत नातू, चिंतामणराव सांगलीकर, वगैरे भु—देवाचें स्वराज्यद्रोही कारस्थान परशुरामाच्या कृपेन तडीस गेलें. बाळाजीपंत नातू यानें कंपनी सरकाराकडून जहागिऱ्या मिळविल्या, आप्पासाहेब भोसल्याची दिवाणगिरी मिळविली, नौबदीचे अधिकार मिळवले, बाळा जोशी नांवाच्या एका हलकट वांईकर ब्राम्हणाला त्याच्या ‘ राष्ट्रीय ’ खटपटीबद्दल जहागिरी बक्षिस दिली, आणि नातूचे परात्पर गुरू रेसिडेंट ओव्हन्स साहेब यांना मुंबई सरकारच्या शिफारसीवरून वार्षिक चारशें पौंडांचा जादा मलीदा सुरू झाला. सख्या थोरल्या भावाच्या सर्वस्व-घाताच्या रक्तांनीं माखलेल्या तक्तावर अप्पासाहेब भोसल्यानें १८ नोव्हेंबर १८३९ रोजीं आपणास राज्याभिषेक

करून घेतला आणि रात्रौ दीपोत्सव करण्याच्या बाबतींत स्वराज्य-द्रोही ब्राम्हणांनीं कस्सून मेहनत घेतली. बांधवहो! स्वराज्याच्या अधःपाताचा हा इतिहास मीं आपणास फारच थोडक्यांत सांगितला आहे. हा इतिहास मी लवकरच ग्रंथरूपानें बाहेर काढणार आहें; त्यावेळीं स्वराज्यद्रोहाच्या रंगपटावर आणखी शेंकडों ब्राम्हण वीर महावीर आणि त्यांचीं असंख्य अमानुष कारस्थानें आपल्या दृष्टीला पडतील. हा सर्व इतिहास जिवंत राखण्याचें श्रेय एका कायस्थ वीरानें मिळविलेलें आहे. प्रतापसिंहावर नातू कंपूनें अनन्वित किटाळ उभारून त्यांना तुरुंगांत टाकल्यानंतर या अन्यायाची दाद पार्लमेंटापर्यंत पोंचविण्याकरितां

## हिंदवी स्वराज्याचें पहिलें डेप्युटेशन

विलायतेस घेऊन जाणारा सच्चा कायस्थ बच्चा रंगो बापूजी गुप्ते हा होय. यानें सतत चवदा वर्षें विलायतेस झगडून न्याय मिळविण्याचा यत्न केला. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणा, किंवा योगायोगाची गोष्ट म्हणा कीं ज्या दादजी नरस प्रभूनें आद्य छत्रपति शिवाजी महाराज यांच्याशीं स्वराज्यस्थापनेची आणभाक केली, त्याच्याच अस्सल चौथ्या वंशजावर त्याच हिंदवी स्वराज्याचा भिक्षुकशाहीकडून झालेल्या खुनाचा न्याय मिळविण्यासाटीं विलायतेस जाण्याचा प्रसंग यावा, हा योगायोग विलक्षण नव्हे काय? असो. रंगो बापुजीची विलायतेची कामगिरी हा एक स्वतंत्र विषय आहे. तो आपल्याला माझ्या पुस्तकांतच पहावयाला मिळेल, इतकें सांगून मी पुरें करितों.

मुक्काम ____________________

तारीख ____________ १९२

पूर्ण नांव ________________________________________

पूर्ण पत्ता ________________________________________

________________________________________________

वि. वि. चालू वर्षापासून **प्रबोधन** मासिकाचा वर्गणीदार म्हणून माझें नांव नोंदवावें. आजरोजीं वार्षिक वर्गणी रु. ४ म. आ. नें पाठवीत आहे. ती पावतांच प्रसिद्ध झालेले सर्व अंक व **स्वाध्याय-संदेश** हा ग्रंथ बक्षिस पाठवावा. (२) त्याचप्रमाणें **कोदण्डाचा टणत्कार** (किं. १॥ रु.) सवलतीची किं. एक रुपाया, हा ग्रंथ व्हीपीनें पाठवून द्यावा. स्वीकार करूं.

सही ____________________________

जादा मजकूर लिहिण्याची जागा.

POST CARD.

व्यवस्थापक

प्रबोधन कचेरी

३४९ सदाशिव पेठ,

POONA CITY.

लवकरच प्रसिद्ध होईल.

[ प्रबोधन लघुग्रंथमाला, पुष्प ४ थें. ]

# बापाची कसरत

आणि

# मुलीची फसगत.

श्री. सुंदराबाई निगोसकर या कुमारीच्या बलीदानाचें नाटक रंगविण्यांत इंदोर संस्थानांत झालेल्या कांचनभटी भिक्षुकी कटाची तपशीलवार हकीगत वाचतांना वाचकांची मनें विचारक्रांतीनें सत्यशोधनाकडे वळतील.

पत्ता:—प्रबोधन कचेरी, ३४५ सदाशिव पेठ,
पुणें शहर.

# प्रबोधन मासिक.

गेलीं तीन वर्षें प्रबोधन पाक्षिक होतें. एप्रिल १९२५ पासून तें मासिक झालें. प्रस्तुत पुस्तकावरून त्याच्या लेखणी व विचारांची दिशा कळून येईल. अग्रलेखांच्या नमुन्याचें पुस्तक चार आण्यांचीं तिकिटें पाठवून मागवा. वाचा, मनाची खात्री पटवा आणि मग वर्गणी-दार व्हा. कोणत्याही क्षेत्रांत हिन्दु कोणाचाहि गुलाम राहूं नये, ही प्रबोधनाची महत्त्वाकांक्षा आहे. मनिऑर्डर कार्ड फक्त पाठवतोस

## वर्गणीदार व्हा.

पत्ताः- प्रबोधन कचेरी, २८५ सदाशिव पेठ

पुणें शहर.